शुक्रवार, १२ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक २६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

धरमतरकडे निघालेले दोन बार्ज भरकटले/२
नवी मुंबईत मोबाइल चोरणारे त्रिकुट अटकेत/६
रसायनीतील स्पर्धकांचे जम्प रोप स्पर्धेत सुयश/८

## आयकर विभागाने जप्त केली ३९० कोटींची मालमत्ता



**जालना** : आयकर विभागाकडून जालन्यात स्टील कारखानदार, कपडे व्यापारी आणि रिअल इस्टेट डेव्हलपर यांच्या घरांवर छापा टाकल्यानंतर रोख रकमेसह तब्बल ३९० कोटींची बेहिशेबी मालमत्ता जप्त केली आहे. यामध्ये ५८ कोटींची रोख रक्कम तसेच ३२ किलो सोन्याचे दागिने, हिरे असा ऐवज आहे. याशिवाय ३०० कोटींच्या बेहिशेबी मालमत्तेची कागदपत्रे सापडली आहेत. १ ते ८ ऑगस्टदरम्यान ही कारवाई सुरू होती. अधिकारी जवळपास १३ तास रोख रक्कम मोजत होते. कारवाईसाठी पाच पथके तयार करण्यात आली होती. यामध्ये औरंगाबादमधील एका व्यापाऱ्याचाही समावेश आहे. स्टेट बँकेत सकाळी ११ वाजता सुरू झालेली मोजणी रात्री १ वाजेपर्यंत सुरू होती. राज्यभरातील आयकर विभागाचे २६० अधिकारी, कर्मचारी या कारवाईत सहभागी झाले होते.



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजप प्रभाग क्र.१९ आणि सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने गुरुवारी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना तिरंगा ध्वज देऊन वाटपास सुरुवात करण्यात आली. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह सोसायटी मित्र मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. **पनवेल** : (वृत्त पान ३ वर...)

# महाविकास आघाडीत पुन्हा धुसफूस

### ■ जयंत पाटील, नाना पटोलेंच्या वक्तव्यावरून नाराजी उघड

**मुंबई : प्रतिनिधी**



शिवसेनेने विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी आमदार अंबादास दानवे यांची निवड केल्यानंतर महाविकास आघाडीत नाराजीचा सूर उमटला आहे. आम्हाला या निवडीवेळी विश्वासात घेतले नसल्याचे मत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले आहे, तर आमची नैसर्गिक आघाडी नाही, ही तात्पुरती आघाडी आहे असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले आहेत. त्यांच्या या वक्तव्यावरून महाविकास आघाडीतील धुसफूस पुन्हा समोर आली आहे.

आमची आघाडी एका विपरीत परिस्थितीत तयार झाली आहे. आम्ही विरोधी पक्षात बसणार होतो, पण जी युती झाली ती कायमस्वरूपी नाही, असे पटोले म्हणाले होते. त्यानंतर पक्षाने जो निर्णय घेतला तो आम्हाला मान्य असेल, असे मत माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, आम्हाला या निवडीवेळी विश्वासात घेतले नसल्याचे मत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले आहे, तर विधान परिषदेच्या निवडीवर आता शिक्कामोर्तब झाले असून त्यावर आम्हाला वाद वाढवायचा नाही, असे मत अजित पवारांनी व्यक्त केले. त्यामुळे अंबादास दानवे यांच्या निवडीवर काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून जाहीर नाराजी व्यक्त केली जात असल्यामुळे महाविकास आघाडी फुटणार असल्याच्या चर्चा होत आहेत.

शिवसेनेत फूट पडल्यापासून महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे एकला चलो रे चे धोरण पहायला मिळाले आहे. विधान परिषदेच्या निवडीवेळीच मविआतील प्रत्येक पक्षाने आपापले उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न केला होता, पण काँग्रेसच्या चंद्रकांत हंडोरे यांचा पराभव झाल्यानंतर आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. त्यानंतर राज्यात सत्तांतर झाल्यावर आता मविआतील मित्रपक्षांची नाराजी उघड होत आहे.

# स्वयंस्फूर्तीने घरोघरी तिरंगा अभियान यशस्वी करा

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे जनतेला आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

'घरोघरी तिरंगा' या अभियानात प्रत्येक नागरिक सहभागी होणार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने राष्ट्रध्वज विकत घेऊन स्वयंस्फूर्तीने घरोघरी तिरंगा हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. ११) मंत्रालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात केले.

देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सोहळा साजरा करण्यात येत असून त्या अनुषंगाने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून घरोघरी तिरंगा हे अभियान राबविण्यात येत असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटाच्या विक्री दालनातून राष्ट्रध्वज विकत घेतले.

१३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण देशात घरोघरी तिरंगा हे अभियान राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांनी घरोघरी तिरंगा या अभियानात प्रत्येक नागरिकाने सहभागी होऊन देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करावा, असे आवाहन केले. या अभियानात महाराष्ट्र अग्रस्थानी राहील, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी व्यक्त केला.

या वेळी मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांनी महिला बचत गटाच्या विक्री दालनातून विकत



घेतलेले राष्ट्रध्वज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते त्यांना देण्यात आले, तसेच महिला बचत गटाच्या महिलांनी स्वत: तयार केलेले राष्ट्रध्वज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना भेट दिले. या कार्यक्रमास मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, घरोघरी तिरंगा अभियानाचे नोडल अधिकारी अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांच्यासह विविध विभागांचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्षाबंधन असल्याने महिला बचत गटाच्या महिलांनी आणि सलाम बॉम्बे या संस्थेच्या विद्यार्थिनींनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना राखी बांधून हा सण साजरा केला.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात घरोघरी तिरंगा अभियानानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत राष्ट्रध्वजासह सेल्फी काढून घेण्यासाठी एकच गर्दी उसळली होती. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदेखील सर्वांच्या इच्छेला मान देत, प्रत्येकापाशी थांबत सेल्फी काढत होते. भारत माता की जय आणि जय हिंद अशा घोषणांनी मंत्रालय दणाणून गेले होते.

## जगदीप धनखड यांनी घेतली देशाच्या उपराष्ट्रपतिपदाची शपथ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल जगदीप धनखड यांनी देशाचे १४वे उपराष्ट्रपती म्हणून गुरुवारी (दि. ११) शपथ घेतली. नवनिर्वाचित राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी धनखड यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. दिल्लीतील राष्ट्रपती भवनात हा शपथविधी सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह विविध पक्षातील नेते या शपथविधी सोहळ्यात उपस्थित होते.

शपथविधीआधी धनखड यांनी दिल्लीतील राजघाटावरील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या समाधीस्थळी आदरांजली वाहिली. राजघाटावरील निर्मळ आणि शांत वातावरणात पूज्य बापूंचा आशीर्वाद घेतल्यानंतर धन्य वाटले, अशी भावना या भेटीनंतर धनखड यांनी व्यक्त केली. या भेटीचा व्हिडीओ त्यांनी ट्वीट केला आहे.

## नि व ड क

### सीईटी परीक्षेदरम्यान सर्व्हर डाऊन

**मुंबई** : बोरिवलीच्या शाळेत इंजिनियरिंगच्या सीईटी परीक्षेदरम्यान गुरुवारी (दि. ११) सर्व्हर डाऊन झाल्याने ३००हून अधिक विद्यार्थी परीक्षेला मुकले आहेत. या गोंधळानंतर, तांत्रिक अडचण दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असून परीक्षेबाबत पालक आणि विद्यार्थ्यांनी कोणतीही काळजी करू नये. ज्यांची परीक्षा होऊ शकली नाही, अशा विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घेण्याचा आम्ही निर्णय घेतला असल्याचे सीईटीचे आयुक्त रविंद्र जगताप यांनी सांगितले.

### दिल्लीत पुन्हा मास्क सक्ती

**नवी दिल्ली** : दिल्लीमध्ये वाढत्या कोरोना रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा मास्क सक्ती करण्याचा निर्णय केजरीवाल सरकारने घेतला आला आहे. सार्वजनिक ठिकाणी ही मास्क सक्ती असणार असून, नियम मोडणाऱ्यांवर ५०० रु. दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या सक्तीतून खासगी चारचाकी वाहनचालक आणि प्रवाशांना सूट देण्यात आली असून, खासगी वाहनामध्ये मास्क घालणे अद्यापही ऐच्छिक असणार आहे. मास्क सक्ती नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे यासाठी पथके तयार करण्यात आली आहेत.

### टाळेबंदीच्या काळातील साखळी आंदोलन

# व्यापाऱ्यांवरील खटले मागे घेणार

### ■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

**पुणे : प्रतिनिधी**

टाळेबंदीच्या काळात साखळी आंदोलन करणाऱ्या व्यापाऱ्यांवर दाखल करण्यात आलेले खटले विनाविलंब मागे घेतले जातील, असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

टाळेबंदीला विरोध म्हणून हवालदिल झालेल्या व्यापाऱ्यांनी एप्रिल २०२१मध्ये शांततामय मार्गाने साखळी आंदोलन केले होते. या दरम्यान सुव्यवस्थेची कोणतीही परिस्थिती उद्‌भवली नसतानादेखील या व्यापाऱ्यांवर खटले दाखल करण्यात आले होते. कोरोना काळातील हे खटले मागे घेण्याची विनंती पुणे व्यापारी महासंघाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे



केली होती. त्यावर हे खटले विनाविलंब मागे घेतले जातील, असे ठोस आश्वासन फडणवीस यांनी दिले, अशी माहिती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका आणि सचिव महेंद्र पितळीया यांनी गुरुवारी (दि. ११) दिली.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून विषय पूर्णत्वास न्यावा, असे निर्देश फडणवीस यांनी माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना दिले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनिमित्ताने केंद्र सरकारच्या हर घर तिरंगा अभियानामध्ये व्यापारी सहभागी होणार आहेत. आपल्या स्वातंत्र्याचे प्रतिक म्हणून सर्व व्यापाऱ्यांनी अभियानामध्ये सहभागी होण्याचे आवाहन पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका आणि सचिव महेंद्र पितळीया यांनी केले आहे. व्यापाऱ्यांनी १३ ते १५ ऑगस्टपर्यंत आपआपल्या घरी तिरंगा फडकवावा. दुकानांवर रोषणाई आणि सजावट करावी, तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून देशाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमात उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन रांका यांनी केले.



### महाडजवळ अपघातात एक ठार, चार जण जखमी

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर टोळगावच्या उड्डाणपुलावर गुरुवारी (दि. ११) दुपारी दोन कारची समोरासमोर धडक झाली. या अपघातामध्ये एक जण जागीच ठार झाला असून चार प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.

टोळगावातील उड्डाणपुलावर गुरुवारी स्विफ्ट कार (क्र. एमएच ०६ बीएम ५७२१) आणि महाड ते माणगाव जाणारी होंडा सिटी कार (क्र. एमएच ४३ एक्स २५३७) या कार समोरासमोर धडकल्या. अपघातामध्ये होंडा कारचालक अनिकेत महाडिक (२५ रा. वडघर गोरेगाव) हे जागीच ठार झाले, तर प्रतीक महाडिक (२२ गोरेगाव), सुहास दांडेकर (६७), सुरेखा दांडेकर (६५), अनिकेत दांडेकर सर्व रा. माणगाव हे जखमी झाले असून त्यांच्यावर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले.

## विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन १७ ऑगस्टपासून

### सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

सन २०२२चे पावसाळी अधिवेशन बुधवार (दि. १७) पासून विधान भवन मुंबई येथे होणार आहे. १७ ते २५ ऑगस्ट या कालावधीत अधिवेशनाचे कामकाज होणार असून विधानसभा आणि विधान परिषद कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवारी (दि.११) झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.



मुंबईत विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. या वेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, दादाजी भुसे, उदय सामंत, विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधान परिषद व विधानसभा कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधानमंडळ सचिवालय प्रधान सचिव राजेंद्र भागवत आदी उपस्थित होते.

२० ते २२ ऑगस्ट दरम्यान सार्वजनिक सुट्या असल्याने २४ ऑगस्ट रोजी विधिमंडळ कामकाजात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रम होणार आहे. बैठकीत पावसाळी अधिवेशन विधान परिषद व विधानसभा बैठकांबाबत चर्चा करण्यात आली.

### सण... भाऊ-बहिणीच्या अतूट नात्याचा...



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना गुरुवारी त्यांच्या भगिनी भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, अनुसया वास्कर, राधाताई ठाकूर, चंद्रभागा घरत व प्रमिला वास्कर यांनी राखी बांधली.** (छाया : लक्ष्मण ठाकूर) **अधिक छायाचित्रे पान ३ आणि ८ वर..**

## रायगडात नारळीपौर्णिमा उत्साहात



**अलिबाग : प्रतिनिधी**

नारळीपौर्णमेचा सण गुरुवारी (दि. ११) रायगड जिल्ह्यात उत्साहात साजरा झाला. अलिबागसह मुरूड, दिघी, श्रीवर्धन, नावगाव, भरडखोल, वरसोली, रेवदंडा येथील कोळीवाड्यामध्ये सामुहिक कार्यक्रम झाले.

सायंकाळी वाजत-गाजत मिरवणुका निघाल्या. पारंपरिक वाद्यसंगीताच्या तालावर कोळी बांधव, भगिनी, लहान मुलेही बेधुंद होऊन नाचत कोळी भगिनी डोक्यावर मंगल कलश घेऊन निघाल्या होत्या. समुद्रकिनारी या मिरवणुकांची सांगता झाली. किनाऱ्यावर कोळी बांधवांनी आपल्या होड्या सजवल्या होत्या. तिथे पूजा अर्चा करून सोन्याने मढवलेला नारळ सागराला अर्पण करण्यात आला. याबरोबरच रक्षाबंधनाचा सणदेखील उत्साहात साजरा झाला. बहिणींनी आपल्या भावांना राखी बांधली आणि आपल्या रक्षणाची हमी घेतली.

# पनवेल मनपाकडून गणेशोत्सव मंडळांना नोंदणी शुल्क माफ

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेतर्फे गणेशोत्सव २०२२करीता गणेश मंडळांकडून गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मंडप परवानगी शुल्क, नोंदणी शुल्क व अग्निशमन शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतल्याचे प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी जाहीर केले आहे.

सार्वजनिक गणेश उत्सवानिमित्त नियोजन करण्याच्या हेतूने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात नुकतीच बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत गणेशोत्सव शुल्क माफ करावे, अशी मागणी गणेश मंडळांनी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार नोंदणी शुल्क माफ करण्याचे कळविण्यात



आलेले आहे. त्यानुसार प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांनी मंडप परवानगी शुल्क, नोंदणी शुल्क व अग्निशमन शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

पनवेल महानगरपालिका गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांना ऑनलाईन पद्धतीने परवानगी देणार आहे. यासाठी http://smartpmc.in/Login ही वेबसाईट तयार केली असून, गणेश मंडळांनी या वेबसाईटवर जाऊन अर्ज सादर करावेत असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे, तसेच महापालिकेच्या वतीने हा परवाना मिळण्यासाठी एक खिडकी योजनेअतंर्गत अग्निशमन ना हरकत दाखला, वाहतुक ना हरकत दाखला व महानगरपालिकेची मंडप उभारण्याबाबतची परवानगी मिळणार आहे.

**इथे करा संपर्क** :

गणेश मंडळांनी अधिक माहितीसाठी महापालिकेच्या १८००-२२७-७०१ या टोल फ्री क्रमांक संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी panvel corporation@gmail.com ई-मेल, दुरध्वनी क्रमांक : ०२२-२७४५८०४०/४१/४२, व्हॉट्सअॅप क्रमांक व एसएमएस सुविधेसाठी ९७६९०१२०१२ हे क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

# रायगडमध्ये आजपासून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## समुद्रकिनाऱ्यावर १५ ऑगस्टला देशभक्तीपर गितांचा कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्हा प्रशासनातर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यात १२ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवाची सांगता १५ ऑगस्ट रोजी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाने होणार असल्याची माहिती रायगडचे अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी दिली. या वेळी उपजिल्हाधिकारी सर्जे राव म्हास्के-पाटील, तहसिलदार विशाल दौंडकर उपस्थित होते.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव या कार्यक्रमाची सुरुवात १२ ऑगस्ट रोजी अलिबाग येथील जनरल अरुणकुमार वैद्य विद्यालयात होणार आहे. दुपारी ४ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या आहेत. १३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रॅली काढली जाणार आहे. सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय ते मुरुड अशी मोटारसायकल रॅली आयोजित करण्यात आली आहे. या रॅलीमध्ये ७५ मोटारसायकलस्वार सहभागी होणार आहेत. दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून सायकल रॅली काढली जाणार आहे. १४ ऑगस्ट रोजी रायगड पोलीस अधीक्षक कार्यालय येथून सकाळी ७.३० वाजता स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दौड आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ८ वाजता किल्ले सागरगड येथे स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले आहे. तसेच इतर कार्यक्रमही या दिवशी होणार आहेत. १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी दिली.




### ८ लाख ७१ हजार घरांवर झेंडा फडकणार

जिल्ह्यातील प्रत्येक घरावर १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये भारताचा तिरंगा फडकवला जाणार आहे. रायगड जिल्ह्यातील ८ लाख ७१ हजार घरांवर झेंडा फडकवला जाणार आहे. जिल्ह्यासाठी आवश्यक असलेले झेंडे उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक ग्रामपंचायत तसेच नगरपरिषदेतर्फे ध्वज विक्री केली जाणार आहे. जिल्ह्यामध्ये शिरढोण येथे हुतात्मा भाई कोतवाल स्मारक, कर्जत येथे हुतात्मा हिराजी पाटील, पोलादपूर उमरठ येथे तानाजी मालुसरे स्मारक, महाड येथे रायगड किल्ला व चवदार तळे, अलिबाग येथे कान्होजी आंग्रे स्मारक आदि नऊ ठिकाणी तिरंगा फडकविण्यात येणार आहे.

# स्वातंत्र्यदिनी झेंडावंदनाची नवनियुक्त मंत्र्यांवर जबाबदारी

**मुंबई : प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे सरकारने अद्याप पालकमंत्री नेमले नसल्याने जिल्हास्तरावरील यंत्रणांना पालक नाही. स्वातंत्र्यदिनी संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय कार्यक्रमात ध्वजारोहण केले जाते. मात्र मंत्र्यांना अद्याप जिल्ह्यांचे वाटप झाले नसल्याने कोणता मंत्री १५ ऑगस्टच्या दिवशी कोठे जाणार, याची उत्सुकता होती. मुख्यमंत्र्यांसह २० मंत्री असल्याने इतर सोळा जिल्ह्यांत विभागीय आयुक्त किंवा संबंधित जिल्हाधिकारी यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आली आहे.

बहुतांश नेत्यांना आपापले जिल्हे दिले आहेत. आता जे मंत्री ध्वजारोहणासाठी येतील तेच पालकमंत्री त्या जिल्ह्याचे राहतील का? याची उत्सुकता आहे. दरम्यान, सर्वाधिक उत्सुकता ही पुण्याची आहे. कारण पुण्याचे पालकमंत्रीपद खुद्द देवेंद्र फडणवीस स्वीकारणार असल्याची चर्चा आहे. तसे संकेत प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पुण्यात दिले होते. प्रत्यक्षात फडणवीस हे नागपूर येथेच ध्वजारोहण करणार आहेत. पाटील यांच्याकडे पुण्याची जबाबदारी आहे.

दरम्यान, झेंडावंदनाची तयारी राज्यात जवळपास पूर्ण होत आली आहे.

### हे मंत्री करणार झेंडावंदन

देवेंद्र फडणवीस- नागपूर
सुधीर मुनगंटिवार- चंद्रपूर
चंद्रकांत पाटील- पुणे
राधाकृष्ण विखे पाटील- नगर
गिरीश महाजन- नाशिक
दादा भुसे- धुळे
गुलाबराव पाटील- जळगाव
रवींद्र चव्हाण- ठाणे
मंगलप्रभात लोढा- मुंबई
दीपक केसरकर- सिंधुदुर्ग
उदय सामंत- रत्नागिरी
अतुल सावे- परभणी
संदिपान भुमरे- औरंगाबाद
सुरेश खाडे- सांगली
विजयकुमार गावित- नंदुरबार
तानाजी सावंत- उस्मानाबाद
शंभूराज देसाई- सातारा
अब्दुल सत्तार- जालना
संजय राठोड- यवतमाळ
अमरावती येथे विभागीय आयुक्त झेंडावंदन करतील.

कोल्हापूर, रायगड, बीड, हिंगोली, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, अकोला, सोलापूर, लातूर, वाशिम, बुलडाणा, पालघर, नांदेड या ठिकाणी संबंधित जिल्हाधिकारी ध्वजारोहण करणार आहेत.



**मुंबई : शिवसेनेचे उपजिल्हा संघटक परेश पाटील हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आणि शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटात सामील झाले आहेत. या वेळी परेश पाटील यांच्या समवेत पनवेल येथील शाखाप्रमुख सतीश पाटील हेदेखील शिंदे गटात सहभागी झाले आहेत. हा कार्यक्रम मुख्यमंत्री यांच्या वर्षा निवासस्थानी झाला. या मुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना पनवेल तालुक्यातून पुन्हा एकदा जोरदार धक्का बसला आहे.**

## रोह्यात पावसाचा जोर कायम

### दिवसभर वीज खंडीत; जनजीवन विस्कळीत

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह ग्रामीण भागात गुरुवारी दिवसभर पाऊस पडला आहे. गेले ५ दिवस रोह्यात जोरदार पडत असून रोह्यात पावसाचा जोर कायम असल्याने कुंडलिका नदी भरुन वाहत आहे. त्यामुळे सर्वत्र पाऊसमय वातावरण निर्माण झाले आहे.

रोहा तालुक्यात जोरदार पाऊस पडत असताना गुरुवारी रात्री वाराही सुटला होता. जोरदार पावसामुळे गुरुवारी पहाटे वीज खंडीत झाल्यानंतर शहरासह ग्रामीण भागात सातत्याने वीज खंडीत होत होती तर काही भागात पहाटे गेलेली वीज सायंकाळी आली. काही ठिकाणी १२ तास वीज खंडीत झाल्याचे दिसून आले.

आठवडाभर रोहा तालुक्यात पाऊस पडत असल्याने तालुक्यातील मेढा, धामणसई, चणेरा, खांब, कोलाड सुतारवाडी, देवकान्हे, पिंगळसई, घोसाळे, भालगाव धाटाव आदी भागात सर्वच ठिकाणी डोंगर माथ्यावरील ओढे, नाले भरुन वाहत आहेत. तर दुसरीकडे कुंडलिका नदी भरून वाहत आहे. दरम्यान, चांगला पाऊस पडत असल्याने मुबलक पाणी शेतीसाठी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. लावणी पूर्ण झाल्यानंतर भातशेती हिरवीगार दिसून येत आहे.

# धरमतरकडे निघालेले दोन बार्ज भरकटले



उरणच्या किनाऱ्यावर सुरक्षित; कर्मचारी सुखरूप

**उरण : प्रतिनिधी**

मुंबईकडून इस्पात कंपनीकडे निघालेल्या परंतु वादळामुळे भरकटलेल्या दोन मालवाहू बार्ज उरण-केगाव येथील खडकाळ किनाऱ्यावर पोहोचल्या आहेत. या भरकटलेल्या दोन्ही बार्जची, कोस्ट गार्ड, नवी मुंबई सागरी सुरक्षा शाखेचे पोलीस आणि तहसिलदारांनी माहिती घेतल्यानंतर अनेक शंका कुशंका दूर झाल्याची माहिती उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे.

बुधवारी मुंबईकडून एसएन ऑल कंपनीचे एमव्ही-श्रीकांत आणि अरब इंटरप्राईझेस कंपनीचे एमव्ही-जी-दोन या दोन मालवाहू बार्ज रायगड जिल्ह्यातील धरमतर येथील इस्पात कंपनीकडे निघाल्या होत्या. मात्र वादळामुळे समुद्रात उसळणाऱ्या उंचच लाटांमुळे नांगर तोडून या दोन्ही बार्ज भरकटून उरण तालुक्यातील केगाव-माणकेश्वर मंदिराच्या किनाऱ्यावर येऊन ठेपल्या. एमव्ही-श्रीकांत ही रिकामी बार्ज केगाव-माणकेश्वर मंदिराजवळील तर एम व्ही-जी-दोन अरब इंटरप्राईझेस ही दुसरी बार्ज सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या करंजा-एनएडी नेव्ही जेट्टीच्या खडकाळ किनाऱ्यावर मध्यरात्रीच्या सुमारास लागल्या आहेत. या दोन्ही मालवाहू बार्जची सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कोस्ट गार्डने हेलिकॉप्टरने पाहणी केली आहे.

## ‘अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोल्यात सुरू करा’

**अकोला : प्रतिनिधी**

अकोला येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अकोला जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. संजय तिडके यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविले आहे. दरम्यान, मुख्यमंत्री कार्यालयाला हे निवेदन प्राप्त झाले असून पुढील कार्यवाहीसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे ते पाठविण्यात आल्याचे वृत्त आहे.

**सांस्कृतिक कट्टा**
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल
**गाथा स्वातंत्र्याची**
(एक संगीत महापर्व)
(प्रवेश विनामूल्य)
(१३ ऑगस्ट, सायं. ७ वा.)

# अलमट्टीतून दोन लाख क्युसेकने विसर्ग

**सांगली : प्रतिनिधी**

जिल्ह्यात दोन दिवस पावसाने उघडीप दिली होती पण शिराळा तालुक्यासह वारणा (चांदोली) धरण परिसरात मात्र पाऊस सुरू आहे. यामुळे वारणा धरणातून ९४४८ क्युसेकने विसर्ग सुरू झाल्यामुळे वारणा नदीचे पाणी पात्राबाहेर गेले असून बंधारेही पाण्याखाली गेले आहेत. कृष्णा नदीची दिवसात पाच फुटाने पाणीपातळी वाढून २५ फुटांवर गेली आहे. नागठाणे, कसबे डिग्रज बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

शिराळा, वाळवा तालुक्यांत किरकोळ पाऊस झाला आहे. उर्वरित तालुक्यात बुधवारी पावसाने उघडीप दिली होती. वारणा (चांदोली) धरण क्षेत्रात मात्र अतिवृष्टी सुरूच आहे. बुधवारी सकाळी आठपर्यंतच्या २४ तासात १३८ मिलिमीटर तर दिवसभरात २० मि.मी. पाऊस झाला आहे. धरणात ३१.०५ टीएमसी पाणीसाठा झाला असून धरण ९१ टक्के भरले आहे. या मुळे ९४४८ क्युसेकने विसर्ग सुरू आहे. वारणा नदीचे पाणी पात्राबाहेर गेले असून सात पूल पाण्याखाली गेले आहेत.

कोयना धरण क्षेत्रातही अतिवृष्टी सुरूच आहे. या धरणात ८०.४५ टीएमसी पाणीसाठा झाला असून धरण ७६ टक्के भरले आहे. धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत असल्यामुळे कोणत्याही क्षणी धरणातून विसर्ग सुरू होईल.

### पाणीपातळी वाढल्यास आणखी विसर्ग वाढणार

*अलमट्टी धरणामध्ये १२३ टीएमसी पाणीसाठा करण्याची क्षमता आहे. मंगळवारी धरणात ११७.५४ टीएमसी पाणीसाठा होता. धरणात एक लाख दोन हजार १८६ क्युसेकने पाण्याची आवक होत आहे. यामुळे बुधवारी सायंकाळी पाचनंतर दोन लाख क्युसेकने विसर्ग सुरू करून दोन टीएमसीने पाणीसाठा कमी करून सध्या ११५.५४ टीएमसी ठेवला आहे. धरणात पाण्याची आवक वाढल्यास आणखी विसर्ग वाढविण्याची अलमट्टी जलसंपदा प्रशासनाने तयारी ठेवली आहे.*

**धरणातील पाणीसाठा**

| धरण | क्षमता | सध्याचा पाणीसाठी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| अलमट्टी | १२३ | ११५.५४ | ९३.८८ |
| कोयना | १०५.२३ | ८०.४५ | ७६ |
| वारणा | ३४.२० | ३१.०५ | ९१ |

## भाजपचे माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांचे निधन

**शिरूर : प्रतिनिधी**



सलग सहावेळा शिरूर विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविणारे आणि विजय प्राप्त करणारे माजी आमदार बाबुराव काशीनाथ पाचर्णे (७१) यांचे दीर्घ आजाराने गुरुवारी (दि. ११) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, माजी जिल्हा परिषद सदस्य असलेले पुत्र राहुल पाचर्णे, एक मुलगी, जावई कर्नल महेश शेळके, नातवंडे, चार भाऊ, पाच बहिणी असा परिवार आहे. बाबुराव पाचर्णे हे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते होते. दरम्यान सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यानच त्यांच्या प्रकृतीविषयी कुरबुरी सुरू झाल्या होत्या. त्या निवडणुकीतील पराभवानंतर ते राजकारणातून काहीसे अलिप्त झाले होते. दीड वर्षांपूर्वी त्यांना कर्करोगाचे निदान झाले. पुण्यातील खासगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार चालू होते. यादरम्यान, त्यांच्या प्रकृतीत अनेकदा चढउतार झाले. परंतू कर्करोगाने त्यांना ग्रासल होते. खासगी रूग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-30/22-23 **7000024134** | Work of strengthening of 400 & 220kV MMR region connected bays at 400kV RS(O&M) Div, Kharghar . | **Rs. 32.15 Lakhs** |
| Tend-31/22-23 **7000024020** | Supply of portable heavy duty hydraulic crimping machine with die set for maintenance work at substation maintenance S/dn. Kandalgaon and KTL S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn. Mahad | **Rs. 9.36 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 12.08.2022 to 21.08.2022 up to 23:59 hrs, Opening date:-22.08.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8356921558 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# जेएनपीए सेझ कॉन्क्लेव्हला गुंतवणूकदारांचा उत्तम प्रतिसाद

**उरण : प्रतिनिधी**




भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण अर्थात जेएनपीएने भारतीय उद्योग महासंघाच्या सहकार्याने १० ऑगस्ट २०२२ रोजी सुरत येथे जेएनपीए सेझ इन्व्हेस्टर कॉन्क्लेव्ह २०२२ चे आयोजन केले होते. या कॉन्क्लेव्हच्या आयोजनाचा उद्देश्य गुंतवणुकदारांना भविष्यातील विकास प्रकल्पांमध्ये मध्ये गुंतवणूक करण्यासाठी आणि देशाच्या वाढत्या बंदर-आधारित औद्योगिकीकरणाचा एक भाग होण्यासाठी भरपूर संधी उपलब्ध करून देणे हा होता.

बंदर आधारित अर्थव्यवस्थेस चालना देण्याच्या उद्देशाने जेएनपीएने आपल्या २७७.३८ हेक्टर फ्रीहोल्ड जमिनीवर बहुउत्पादन विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्प विकसित केला आहे, ज्यामध्ये बंदराच्या जमीन वापर योजनेचा समावेश आहे. हे औद्योगिक केंद्र भारतातील पहिले बंदर आधारित बहुउत्पादन कार्यरत एसईझेड आहे. एसईझेडमधील भरपूर संधी आणि विविध वैशिष्ट्यांविषयी माहिती देताना जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले बंदर आधारित औद्योगिकीकरणामध्ये नवीन बेंचमार्क स्थापित करण्याच्या उद्देशाने जेएनपीए एसईझेडच्या या विशिष्ट प्रकल्पासह बंदर आधारित अर्थव्यवस्थेत आपली क्षमता आणि विकासाच्या पैलूंमध्ये वाढ करत आहे, जे सिंगल-विंडो क्लिअरन्सपासून मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटीपर्यंत विविध सुविधा प्रदान करते. ज्यामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये प्रभावी मार्ग आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध होतात. जेएनपीए एसईझेड गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी विशेष प्रोत्साहने देत आहे, जसे की आर्थिक कायदे जे देशाच्या इतर सामान्य आर्थिक नियमांपेक्षा अधिक उदार आहेत आणि पाणी आणि वीज पुरवठ्यासाठी अनुदानित दर आहेत. जेएनपीए सेझसाठी पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये विविध सर्व मूलभूत पायाभूत सुविधांचा समावेश होतो. या चर्चेच्या अध्यक्षस्थानी जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ होते. कार्यक्रमाला जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, नितिन बोरवणकर, सीईओ, जेएनपीए एसईझेड उपस्थित होते.




**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शुक्रवार, दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. काळभैरव कार्यालय, कळंबोली ■ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ उपकेंद्र, नावडे

**ग्रामिण लसीकरण**

■ टेंभोडे ■ भोईरपाडा/पेठाली ■ देवीचापाडा ■ फणसवाडी/चाफेवाडी
■ खांदा गाव ■ तळोजे मजकूर/फरशीपाडा

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### उड्डाणपुलावर कार उलटली



**पनवेल :** शहरातील उड्डाणपुलावर एक कार अचानक उलटल्याने दोघेजण जखमी झाल्याची माहिती समोर आली. ठाणा नाका येथून पनवेलच्या दिशेने जाताना उड्डाणपुल चढताना एक कार अचानक उलटली. रात्री साडेदहाच्या सुमारास हा अपघात झाला असून सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

### 'रोटरी'तर्फे विद्यार्थ्यांना साहित्यवाटप



**मोहोपाडा :** रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा यांच्या वतीने वावंढळ शाळेतील ७० विद्यार्थ्यांना स्टिलचे ताट व ग्लासचे वाटप करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना स्टिलचे चांगल्या दर्जाचे जेवणासाठी ताट व ग्लास मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. या वेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष अमित शहा, सेक्रेटरी डॉ. धिरज जैन, माजी अध्यक्ष डॉ. मिलिंद भगत, बाळकृष्ण होनावले, सुशांत उचित व रेश्मा कुरुप आदी उपस्थित होते.

### पोलिसांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**उरण :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने उरण पोलीस ठाणे हद्दीत शहरातील सिटीजन हायस्कूल आणि जूनियर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना बुधवारी (दि. १०) पोलीस प्रशासनातर्फे सायबर गुन्हे, महिलांवरील लैंगिक अत्याचारांबाबत व अमली पदार्थामुळे होणारे दुष्परिणाम, याबाबतचे प्रबोधन करून जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आली. यासोबतच विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन जास्तीत जास्त एमपीएससी व यूपीएससी स्पर्धा परीक्षा देण्याबाबत मार्गदर्शन केले. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील, उपनिरीक्षक वैशाली गायकवाड, गुरव, मुख्याध्यापिका सरवद पेंडकर, सहसचिव अखलाक शिलोत्री, सचिव इस्माईल मुकरी आदी उपस्थित होते.



# पनवेलमध्ये 'घरोघरी तिरंगा' उत्साहात



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घरोघरी तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत १३ ते १५ ऑगस्टदरम्यान प्रत्येकाने आपल्या घरी तिरंगा फडकविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. ११) भाजप प्रभाग क्रमांक १९ आणि सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने तिरंगा वाटप करण्यात आले. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना तिरंगा देऊन त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले.

मिडल क्लास सोसायटी परिसरात तिरंगा वाटप करण्यास सुरुवात झाली. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजारराव, रोशन ठाकूर, प्रवीण मोरबाले, उल्हास झुंजारराव, संदीप पाटील, अमेय देशमुख. प्रद्युम खुटले, स्वरूप वाणी, संतोष कुंवर आदी उपस्थित होते.

## कॅबिनेट मंत्री रवींद्र चव्हाण यांना शुभेच्छा

**उरण : रामप्रहर वृत्त**

भाजप–शिवसेना युती सरकारच्या मंत्रीमंडळात रायगड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री नामदार रवींद्र चव्हाण यांची राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल आचार्य अत्रे कट्टा उरण या संस्थेतर्फे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

संस्थेच्या सभेत कट्ट्याचे संचालक तथा भाजपचे उरण तालुका चिटणीस रायगड भूषण नरेश म्हात्रे यांनी नामदार चव्हाण यांचे अभिनंदन व शुभेच्छा देण्याचा ठराव मांडला. या वेळी ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार जे. एस. घरत म्हणाले की, नामदार चव्हाण हे रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री होते. यामुळे त्यांचे आणि रायगडचे रूणानुसंबंध असुन लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांचे राजकीयदृष्ट्या जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यामुळे ते जिल्ह्यातील विकास कामे ना. चव्हाण यांच्या सहकार्याने करून घेतली.

## राष्ट्रध्वजासंदर्भात नागरिकांना मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात पनवेल महापालिकेकडून घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत पनवेलमधील पटेल पार्क व व्यंकट रेसिडेन्सी येथे बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत राहिवाश्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. या वेळी राहिवाश्यांना राष्ट्रध्वजाविषयी माहिती देण्यात आली.

घरोघरी तिरंगा हा उपक्रम १३ ते १५ ऑगस्ट हे तीन दिवस असून यासंदर्भातील नियमांची माहिती महापालिका उपायुक्त विठ्ठल डाके यांनी दिली, तसेच रहिवाश्यांना झेंड्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापालिका एनजीओचे सदस्य विजय चव्हाण तसेच जाणीव एक सामाजिक संस्थेचे प्रसाद हनुमंते उपस्थित होते.



**पनवेल : मोरावे येथे कोळी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने नारळी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली.**



**पनवेल : घरोघरी तिरंगा या मोहिमेंतर्गत भाजप महाराष्ट्र अल्पसंख्यांक मोर्चाचे राज्य उपाध्यक्ष पत्रकार सय्यद अकबर यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा वाटप व ध्वज प्रदर्शन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सय्यद अकबर यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी महापालिका शॉपिंग कॉम्पलेक्समध्ये तिरंग्यासह घोषणाबाजी केली.**

## सीकेटी विद्यालयात संस्कृत दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रावण पौर्णिमा हा दिवस संस्कृत दिन म्हणून विश्वभरात साजरा होतो. सीकेटी विद्यालयात इंग्रजी माध्यमात हा दिवस अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात बुधवारी (दि. १०) साजरा झाला. कार्यक्रमाची सुरूवात जिनल वालावलकर हिने मेधासूक्त पठणाने केली. यानंतर प्रमुख अतिथी मंजिरी फडके तसेच अर्चना ठाकूर यांचे यथोचित स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटक, संवाद, सुभाषित पठण, नर्मदाष्टक पठण, संस्कृत गीत गायन, भाषण असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम संस्कृत भाषेमध्ये सादर केले. संस्कृत शिक्षिका श्रद्धा जोशी यांनी प्रमुख अतिथी मंजिरी फडके यांचा परिचय करून दिला. मंजिरी फडके या शिक्षणतज्ज्ञ असून 'गुरूकुलम् न्यास' या संस्थेमार्फत भगवद्गीता प्रचाराचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांना उद्बोधित करताना मंजिरीताईंनी सनातन वेद परंपरेचे महत्त्व विषद केले. तसेच संस्कृत भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगून कथेच्या माध्यमातून आपल्या ध्येयासाठी कसे प्रयत्नशील असावे या विषयी मार्गदर्शन केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या संचालिका आणि शाळा समिती सदस्या अर्चना ठाकूर यांनी हा कार्यक्रम भव्यदिव्य स्वरूपात साजरा केल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच विद्यार्थ्यांची प्रशंसा केली.

संपूर्ण कार्यक्रम संस्कृत भाषेत करून एक वेगळा प्रयत्न केल्याबद्दल मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे शुद्ध संस्कृत भाषेत श्रावणी कर्णेकर आणि अथर्व पाटील यांनी सूत्रसंचलन केले.

या वेळी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, शिक्षक पालक संघाच्या सहसचिव तेजश्री कुलकर्णी तसेच इंग्रजी माध्यमिकच्या पर्यवेक्षिका निरजा मॅडम आदी उपस्थित होते.

## भाजप भटके विमुक्त महिला आघाडीतर्फे पोलिसांना राखी



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली भटके विमुक्त प्रदेश अध्यक्ष आमदार नरेंद्र पवार, भटके विमुक्त महिला प्रदेश अध्यक्ष डॉ. उज्वला हाके आणि कोकण विभाग संयोजिका डॉ. समीरा भारती यांच्या मार्गदर्शनाखाली भटके विमुक्त महिला आघाडी कामोठे मंडलच्या वतीने पोलीस बांधवांना राखी बांधण्यात आली.

पोलीस बांधवांना राखी बांधून हा सण साजरा करण्यात आला. कामोठे पोलीस स्टेशनच्या सिनियर पी. आय. स्मिता जाधव, उत्तम जगदाळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना भाजप भटके विमुक्त महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी राखी बांधली.

या वेळी भटके विमुक्त महिला आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हा महिला अध्यक्षा विद्या तामखडे, कामोठे मंडल अध्यक्ष ॲड. वैशाली देवडे, संगीता तामखडे, मनीषा बेरगळ, जयश्री पाटील, दिपाली माने, स्वाती धडस, नीलम सरगर, नूतन आलदर, कोमल ओवे, दिपाली चोपडे, उमा राजभल, शोभा यादव, संस्कृती पाटील, भटके विमुक्त कामोठे मंडल संयोजक सागर पाटील आणि प्रथमेश देवडे उपस्थित होते.












**पनवेल : रक्षाबंधननिमित्त श्रीधरशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, हिराशेठ ठाकूर यांना अनुसया वास्कर, राधाताई ठाकूर, चंद्रभागा घरत, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, प्रमिला वास्कर, तुळसाबाई घरत, सिताबाई भोईर, ठकुबाई म्हात्रे, पद्मावती म्हात्रे, मधुराबाई पाटील, कमलाबाई म्हात्रे या बहिणींनी राखी बांधून सण साजरा केला. तसेच भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना निला गडकरी यांनी राखी बांधून रक्षण करण्याचे वचन घेतले.**

## संपादकीय

# दमदार कामगिरीची चुणूक

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल म्हणजे एनडीआरएफच्या निकषांपेक्षा दुपटीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करण्याऐवजी आताही विरोधक हा निर्णय फसवा असल्याचेच ओरडत आहेत याला काय म्हणायचे? याच विरोधकांनी त्यांचे तीन चाकी बिघाडी सरकार सत्तेवर असताना प्रत्येक नैसर्गिक आपत्तीच्या वेळेस केंद्र सरकारकडे बोट दाखविण्याच्या पलीकडे काहीही केले नव्हते.

**यंदा जुलै महिन्याच्या मध्यावरच राज्यात जोरदार अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यासुमारास मंत्रिमंडळ रचनेची प्रक्रिया पूर्ण व्हावयाची होती. परंतु शेजारच्या गुजरात राज्यात ओढवलेली पूरस्थिती लक्षात घेऊन पदभार हाती घेताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लागलीच कामाला लागले होते. सारा कारभार शिंदे आणि फडणवीस हे दोघेच रेटत असताना विरोधकांनी त्याविरोधात ओरड करण्यापलीकडे त्या संकटसमयी जनतेच्या हिताच्या दृष्टीने काही पाऊल उचललेले दिसले नाही. गडचिरोली जिल्ह्यामध्ये तेव्हा अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर आला होता. त्यामुळे शिंदे आणि फडणवीस यांनी तातडीने गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. पाठोपाठ राज्यातील इतरही जिल्ह्यांना पावसाने झोडपून काढल्याने नवनिर्वाचित सरकारला शिताफीने उपाययोजना करावी लागली. राज्यात १ जूनपासून झालेल्या अतिवृष्टीचा फटका २८ जिल्ह्यांना बसल्याचे एव्हाना समोर आहे. या काळात ११० जणांचा अतिवृष्टीमुळे बळी गेल्याची नोंद असून १४ हजार ४८० नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात शासकीय यंत्रणेला यश आले. याही काळात विरोधकांनी निव्वळ ‘पंचनामे करा, पंचनामे करा’ म्हणत ठणाणा करण्याच्या पलीकडे काही केले नाही. जुलैच्या अखेरीस पावसाचा जोर कमी झाला, परंतु सततच्या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. विशेषत: विदर्भाला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. पाऊस ओसरताच जीवितहानी आणि घरांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करणे शक्य होते. पण शेतीच्या नुकसानीचे पंचनामे शेतातील पाण्याची पातळी ओसरल्याशिवाय शक्य होत नाहीत. परंतु या अडचणी लक्षात न घेता विरोधकांनी आपली ओरड सुरूच ठेवली. अर्थात त्यांच्याकडून अन्य काही अपेक्षाही नाही. मंत्रिमंडळ विस्तारानंतरच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत शिंदे-फडणवीस सरकारने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १३ हजार ६०० रूपयांची भरपाई देण्याचा मोठा निर्णय घेतला. तूर्तास जिरायत शेतकऱ्यांसाठी हा निर्णय घेण्यात आला असून यामध्ये सुमारे ९० टक्के अतिवृष्टीग्रस्त शेतकरी येतात. राज्यातील सुमारे १५ लाख हेक्टर शेतीचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून त्या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळेल असे दिसते. एनडीआरएफच्या निकषानुसार प्रति हेक्टर ६ हजार ८०० रूपये मिळतात, पण या नव्या निर्णयानुसार प्रति हेक्टर १३ हजार ६०० रूपये मिळणार आहेत. आतापर्यंत शेतकऱ्यांना इतकी भरपाई कधीच मिळाली नव्हती हेही वेगळे सांगायला नको. यंदाच्या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका विदर्भातील शेतकऱ्यांना बसला असून त्यांचा विशेषत्वाने विचार करूनच शिंदे-फडणवीस सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळेच विदर्भातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने भरपाई देण्याची मर्यादा दोनवरून तीन हेक्टर करण्यात आली आहे. बागायती शेतीला वाढीव मदत देण्यासंदर्भातला वेगळा निर्णय लवकरच होण्याची शक्यता आहे. सरकारच्या या मोठ्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना निश्चितपणे दिलासा मिळणार असून शिंदे-फडणवीस सरकारने पदार्पणातच आपली कामगिरी कशी दमदार असेल याची चुणूक दाखवून दिली आहे.**

# भावशेत ठाकूरवाडी गाव समृद्धीकडे



डोंगराच्या पायथ्याशी वसलेले, दुर्गम गाव असूनही गावासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा आहेत. गावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना आहे. शाळा, अंगणवाडी, वाचनालय, रस्ते, प्रवेशव्दारावर स्वागत कमान, एकाच रंगाची घरे, शंभर टक्के हागणदारी मुक्त, गावातील सर्व नागरिकांकडे आधार कार्ड, रेशन कार्ड, सर्वांची बँक खाती, उत्पन्न दाखले, जातीचे दाखले, पात्र लाभार्थ्यांची किसान क्रेडीट कार्ड, वयस्कर लोकांसाठी पेन्शन योजना, विधवा निराधार महिलांना शासकीय योजनांचा लाभ, शंभर टक्के लसीकरण झालेले गाव. एखाद्या गावाने असे वर्णन केले तर कदाचित हे स्वप्नातील गावाचे वर्णन वाटेल. परंतु खरेच असे एक गाव आहे. भावशेत ठाकूरवाडी हे या गावाचे नाव आहे.

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात हे गाव आहे. लोकसहभाग, सामाजिक संस्थांचा हातभार या माध्यमातून समृध्दीकडे वाटचाल केली आहे. या गावाने केलेल्या प्रगतीमुळे भावशेत ठाकूरवाडी हे गाव नुकतेच स्वप्नातील गाव म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. गावकऱ्यांसाठी ही एक अभिमानास्पद बाब आहे. पाली तालुक्यातील डोंगरमाथ्याच्या कुशीत वसलेले असे हे भावशेत ठाकूरवाडी हे दुर्गम गाव होय.

काही वर्षांपूर्वी भौगोलिक परिस्थितीमुळे काहीसे दुर्लक्षित आणि मागासलेले गाव होते. हे आदिवासीचे एक गाव आहे. आदिवासी समाजातील ९६ कुटूंबांचे साडेतीनशे ते चारशे लोकवस्तीचे हे गाव आहे. आदिवासी समाजाची वस्ती असूनही गेल्या तीन वर्षात गावाने केलेली वाटचाल थक्क करणारी आहे. या गावातील लोकाची इच्छाशक्ती. त्यांना मिळालेली स्वदेश फाउंडेशनची साथ. स्वदेशच्या कार्यकर्त्यांचे वेळोवळी मार्गदर्शन यामुळेच हे गाव प्रगती करत आहे.

२०१८मध्ये स्वदेश या सामाजिक संस्थेने या दुर्गम गावाचा सर्वांगिण विकास करण्याचा निर्णय घेतला. दुर्गम गाव आणि आदिवासी समाज, अशा ठिकाणी काम करणे सोपे नाही. काम करताना लोकसहभाग महत्त्वाचा असतो. त्यांना आपले विचार समजावून सांगून त्यांच्याकडून काम करून घेणे एक आव्हानच असते आणि आव्हान स्वदेशने उचलले. लोकसहभाग असल्याशिवाय हा विकास शक्य नसल्याचे त्यांच्या



लक्षात आले. त्यामुळे गावातील काही सुशिक्षित तरुणांना एकत्र करून स्वदेशने गावात ग्राम विकास संस्थेची स्थापना केली. गावातील तरुणांकडेच गावाचा विकास करण्याची जबाबदारी सोपविली. त्यासाठी आवश्यक संसाधने, प्रशिक्षण, आर्थिक मदत संस्थेने देण्याचे मान्य केले. स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, साक्षर आणि स्वावलंबी गाव बनविण्याच्या दृष्टीने गावाची वाटचाल सुरु झाली. सुरुवातीला

### थक्क करणारी विकासाची वाटचाल

***एखाद्या गावाला खरे गावपण येते ते तेथील विविध सुविधांमुळे. शासकीय विविध योजना येत असतात. त्याचा लाभ तेथील नागरिकांना मिळाला तर लोकांचा विकास आणि पर्यायाने गावाचा विकास होतो. तसेच शासनाबरोबरच तेथील लोकांचा आणि विविध सामाजिक संस्था यांचा सहभाग असेल तर गावाची विकासाची वाटचाल थक्क करणारी असते. पाली तालुक्यातील डोंगरमाथ्याच्या कुशीत वसलेले भावशेत ठाकूरवाडी हे खरेतर दुर्गम गाव. काही वर्षांपूर्वी भौगोलिक परिस्थितीमुळे काहीसे दुर्लक्षित आणि मागासलेले गाव होते. हे आदिवासींचे एक गाव आहे. आदिवासी समाजातील ९६ कुटूंबांचे साडेतीनशे ते चारशे लोकवस्तीचे हे गाव आहे. आदिवासी समाजाची वस्ती असूनही गेल्या तीन वर्षात गावाने केलेली वाटचाल निश्चितच सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या गावातील लोकांची इच्छाशक्ती, त्यांना मिळालेली स्वदेश फाउंडेशनची साथ आणि मार्गदर्शन यामुळेच हे गाव आज अधिकाधिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे.***

शासनाच्या विविध योजना गावात शंभर टक्के राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. गावातील सर्व नागरिकांची आधार कार्ड काढणे, रेशन कार्ड, बँक खाती काढण्यात आली. उत्पन्न दाखले, जातीचे दाखले काढण्यात आले. यानंतर पात्र लाभार्थ्यांची किसान क्रेडीट कार्ड काढण्यात आली. त्यानंतर वयस्कर लोकांसाठी पेन्शन योजना, विधवा निराधार महिलांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. गावातील प्रत्येकाला आरोग्य विमा योजना लाभ मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

दुसऱ्या टप्प्यात गावातील अंतर्गत रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली. घरकूल योजनेंतर्गत पक्की घरांची बांधकामे सुरु करण्यात आली. गावातील पाणीप्रश्न सुटावा यासाठी स्वत:ची पाणीपुरवठा योजना विकसित करण्यात आली. त्यासाठी सहा किलोमिटर दूरवर असलेल्या पाण्याच्या स्त्रोतातून जलवाहिनी टाकून पाणी आणले. गावात टाकी बांधण्यात आली. पूर्वी या गावातील महिलांना तीन किलोमिटर जाऊन पाणी आणावे लागत होते. आता प्रत्येक घराला नळ जोडणी देऊन थेट घराघरात पाणी पोहोचवण्यात आले आहे. सांडपाणी रस्त्यावर येऊ नये म्हणून घराघरात शोषखड्डे, शौचालयांची उभारणी केली. गाव शंभर टक्के हागणदारी मुक्त झाले आहे. गावातील लोकांनी रोजगार हमी योजनेतून या शोषखड्ड्यांचे बांधकाम केले. त्यामुळे गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. या गावातील लोक पूर्वी बिगारीकाम करत असत. आता हेच लोक गवंडी काम करतात. गावात घर बांधण्यासाठी दुसरीकडून गवंडी आणावा लागत नाही. शाळा, अंगणवाडी, ग्रंथालयाच्या सुसज्ज इमारती उभ्या राहिल्या. सोलर यंत्रणा बसवून या इमारती स्वयंप्रकाशित करण्यात आल्या.


**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



डिजीटल शाळाही कार्यान्वयीत झाली. शेतीला कुक्कुटपालन, शेळीपालन, म्हैस पालनाची जोड दिली. यामुळे कुटूंबाच्या उत्पन्नात भर पडली. स्थलांतरण रोखण्यास मदत झाली. गावातील घरांना एकाच रंगसंगतीने रंगविण्यात आले. गेल्या तीन वर्षात गावात एक कोटींहून अधिक रुपयांची कामे करण्यात आली.६३ प्रकारच्या कामे गावकऱ्यांनी लोकसहभागातून केली. त्यामुळे विकासाला शाश्वत स्वरूप प्राप्त झाले. लोकसहभागामुळे गावात समृद्धी आली आहे. या गावाला स्वप्नातील गाव म्हणून घोषीत करण्यात आले आहे. गावकरी एकत्र आले. काम करण्याची इच्छा दाखविली, गावातीलच नेतृत्त्व तयार करण्यात आले. त्यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला. त्यांना स्वदेश फाउंडेशनचे सहकार्य मिळाले. काम मंजूर करून घेण्यासाठी कुठे जायाला हवे त्याचे मार्गदर्शन केले. जी कामे शासनाच्या योजनामध्ये बसू शकत नव्हती तिथे स्वदेश व इतर संस्थांनी निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे हे शक्य होऊ शकले. लोकसहभाग, शासनाची मदत, स्वयंसेवी संस्थांची साथ यामुळे गावाचा कसा विकास करता येतो याचा आदर्श या गावाने घालून दिला.

## बदलते तंत्रज्ञान






# नव्या फिचरमुळे लाँग व्हिडिओ ‘एडिट इंटू अ शॉर्ट’!

व्हिडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म म्हणजेच युट्यूब मध्ये आता कमालीचे फिचर्स येणार आहे. या फिचरच्या मदतीने यूजर्स लांब व्हिडिओदेखील एडिट करू शकणार आहे. युट्यूबमध्ये लाँग व्हिडिओला युट्यूब शॉर्ट्र्समध्ये बदलण्याचे हे नवे टूल असणार आहे. हे टूल तुम्हाला अँड्रॉईड आणि आयओएस या दोन्हीमध्ये उपलब्ध असणार आहे. युट्यूबने या नव्या फिचरला 'एडिट इंटू अ शॉर्ट' असे नाव दिले आहे. चला तर याबद्दलची माहिती आज जाणून घेऊया.

युट्यूबने 'एडिट इंटू अ शॉर्ट' या फिचरची घोषणा करताना सांगितले की, या फिचरच्या मदतीने यूजर्स त्यांच्या लांबलचक व्हिडिओला ६० सेकंदाच्या शॉर्ट व्हिडिओमध्ये बदलू शकतात. या फिचरच्या मदतीने यूजर्स टेक्स्ट, फिल्टरसह त्यांच्या फोन गॅलरीमधील व्हिडिओ आणि फोटोदेखील शॉर्ट करू शकतील. युट्यूबच्या या नव्या अपडेटमुळे क्लासिक कंटेंटमध्ये अजून क्रिएटिव्ह बनविण्यास मदत होते. तसेच यामुळे यूजर्सचा वेळही वाचेल. यूट्यूबने दिलेल्या माहितीनुसार, यूजर्स या फिचरचा वापर करून व्हिडिओ शूटपण करू शकतात. माहितीसाठी यूजर्स फक्त त्यांच्याच व्हिडिओला एडिट करू शकतील. या व्हिडिओमध्ये शॉर्ट व्हिडिओसह तुमचा ओरीजनल व्हिडिओही तुम्हाला बघता येईल.

तुम्हाला हे वाचून आश्चर्य वाटेल की, दर महिन्याला १.५ बिलियनपेक्षा अधिक लोक युट्यूब शॉर्ट्स बघतात. युट्यूब शॉर्ट्र्सच्या व्हूबद्दल बोलायचे झाल्यास युट्यूब शॉर्ट्र्सला जवळपास तीन बिलियन म्हणजेच ३०० कोटी युजर्सकडून बघितले जाते. एकट्या भारतात युट्यूब बघणारे युजर्स ४६.७ कोटीच्या घरात आहेत. दरम्यान, सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग अगदी जवळ आले आहे. घरबसल्या कितीतरी आणि नवनवीन माहिती आपल्याला आज उपलब्ध होत आहे

# युवक समाजातील एक महत्त्वाचा घटक




कोणत्याही देशाचे भविष्य हे त्या देशातील युवकांच्या हाती असते. संयुक्त राष्ट्रांनी जागृती दिन म्हणून स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय युवा दिनामध्ये युवकांच्या आजुबाजूला घडणाऱ्या सांस्कृतिक आणि कायदेशीर समस्यांकडे लक्ष वेधण्याचा हेतू असतो. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय युवा दिन’ म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी या दिनाच्या निमित्ताने युवकांशी निगडीत असणाऱ्या अनेक मुद्द्यांवर, घटकांवर आणि भविष्यातील आव्हांनावर चर्चा घडवून आणली जाते. युवा दिना निमित्त काही थोडक्यात माहिती.

संयुक्त राष्ट्रांनी १९८५मध्ये पहिले आंतरराष्ट्रीय युवा वर्ष साजरे केले. या घटनेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त १९९५ मध्ये जगातील युवावर्गाच्या स्थितीत अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी ‘वर्ल्ड प्रोग्राम ऑफ ॲक्शन फॉर युथ’ स्विकारण्यात येऊन त्या माध्यमातून मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली. यावर्षीचे घोषवाक्य ‘जागतिक चळवळींसाठी युवकांचा सहभाग असे निश्चित करण्यात आले आहे. युवा दिन कार्यक्रमाच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्षण, रोजगार, गरिबी, आरोग्य, पर्यावरण, सहभाग, जागतिकीकरण, युवक आणि संघर्ष, एचआयव्ही एड्स आदी १५ क्षेत्रांची निवड प्राध्यान्याने केली. युवकांना मिळणाऱ्या संधींची संख्या वाढविणे, त्यांची गुणवत्ता वाढविणे आणि त्या माध्यमातून समाजासाठी युवकांचे योगदान वाढविणे या दिशेने या कार्यक्रमाद्वारे चांगले प्रयत्न झाले आहेत. लिस्बन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ दरम्यान पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची

**निमित्त**

शिफारस करण्यात आली आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्कामोर्तब केले. तेव्हापासून हा दिवस युवा दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो.

सुरक्षा परिषदेने आपल्या २०१५ आणि २०१६ च्या ठरावात शांती स्थापनेच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी युवकांची भूमीका महत्त्वाची असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सामाजिक न्याय आणि शांतीस्थापनेच्या अशाच प्रयत्नांना यवर्षीच्या युवा दिनाच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले आहे.

युवक हा समाजात बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. युवकांना नागरिकांचे अधिकार, सामाजिक न्याय आणि विश्वशांतीच्या महत्त्वाबाबत जागरूक केले तर जगात विविध पातळ्यांवर असणारे संघर्ष, वाद कमी होऊ शकतील. अशा अनुकूल बदलासाठी युवावर्ग निश्चितपणे पुढे येईल. जनसामान्यांच्या प्रगतीसाठी जागतिक शांततेचे महत्त्व लक्षात घेता शांतता प्रस्थापित करण्यात युवकांची भूमिका महत्त्वाचे ठरणार आहे. आजचा युवक ज्ञान आणि विज्ञानाच्या विश्वात वावरणारा आहे. मानवी मुल्ये आणि मानवी विकासाबाबत त्याला चांगली जाण आहे. जगातील अनेक समस्यांची उत्तरे शोधण्याची क्षमता त्याच्यात आहे.

**–लेखक डॉ. किरण मोघे**




**स्वातंत्र्याचा ७५ वा अमृत महोत्सव हा फक्त शासकीय उपक्रम न रहाता तो देशाच्या प्रत्येक नागरिकाने उत्स्फुर्तपणे साजरा करावा, यासाठी सर्वत्र नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार जनजागृतीच्या दृष्टीने घरोघरी तिरंगा या संकल्पना मोहीमेंतर्गत एनएमएमटीच्या इलेक्ट्रीक बसेसमधून देशाभिमानपर गीत व संगीत प्रसारित करण्यात येत आहे. या माध्यमातून लोकांच्या मनात राष्ट्रभक्ती जागृत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा अनोखा उपक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी नवी मुंबई महापालिका परिवहन विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी आपल्या नियमित कर्तव्यातून वेळ काढून सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.**

## आरोग्य प्रहर



# ‘टाईप तीन’ मधुमेहाचा मेंदूच्या आरोग्याशी असतो थेट संबंध

मधुमेह हा वयानुरूप येणारा आजार आहे. जसे माणसांचे सांधे थकतात, धावण्याची, काम करण्याची ताकद कमी होते, तशाच इन्सुलिन बनवणाऱ्या बीटा पेशींची क्षमतादेखील मंदावत जाते. आपण आपल्या वागण्याने बीटा पेशींना वेळे आधीच म्हातारे करतो आणि मधुमेहाला निमंत्रण देतो. वय कमी करणे कुणाच्याच हातात नाही. त्यामुळे मधुमेह पूर्ण बरा होण्याची शक्यता निदान नजिकच्या भविष्यात तरी दिसत नाही. टाईप एक मधुमेहामध्ये रुग्णांच्या शरीरात इन्सुलिन अतिशय कमी मात्रेत तयार होते किंवा होतच नाही. यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते. टाईप दोन डायबिटीज शरीरात इन्सुलिन रेजिस्टेंस तयार होतात. मात्र, असे असूनही आपले शरीर याचा वापर करू शकत नाही. हे मधुमेहाचे दोन मुख्य टाईप आहेत. तथापि, अनेकदा टाईप तीनचाही उल्लेख केला जातो. या टाईपला मधुमेहाचा सर्वांत घातक प्रकार म्हटले जाते. यामध्ये रुग्णाला केवळ शारीरिक त्रास होत नाही तर त्याला मानसिक समस्यांनाही सामोरे जाऊ लागू शकते. आज आपण मधुमेहाच्या या धोकादायक टाइपबद्दल अधिक माहिती जाणून घेणार आहोत.

एका मेडिकल रिपोर्टनुसार, काही लोक अल्झायमर रोगांसाठी ‘टाईप तीन मधुमेह’ हा शब्द वापरतात. मात्र बहुतेक आरोग्य संस्था हा शब्द स्वीकारत नाहीत. काही वैज्ञानिकांचे असे म्हणणे आहे की, इन्सुलिन रेजिस्टेंस हे मेंदुतील इन्सुलिनच्या रेजिस्टेंसमुळे मेंदूमध्ये अमायलोइड प्लेक्स, जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह तणाव होतो. डॉक्टरांनीही या आजाराला ‘टाईप तीन मधुमेह’ म्हणून स्वीकारलेले नाही. त्यांच्यानुसार, या आजाराला अल्झायमर रोगांच्या श्रेणीमध्ये ठेवले जावे. सामान्यतः या आजारादरम्यान रुग्णांच्या स्मरणशक्तीवर मोठा परिणाम होतो. यामुळे रुग्णालय अनेक मानसिक आजार होण्याची शक्यता आहे. या आजाराचे लक्षणे अतिशय सामान्य असतात. मात्र वेळेत यावर उपचार न झाल्यास ते गंभीर रूप धारण करू शकतात.

टाईप तीन मधुमेहाची लक्षणामध्ये स्मरणशक्तीवर गंभीररित्या परिणाम होणे. योजना बनविण्यात आणि लिखाण काम करण्यात व्यत्यय येणे. घरातील सामान्य कामकाज पूर्ण करण्यात अडचणी येणे. एखाद्याला भेटण्याची जागा वारंवार विसरणे. यामुळे वेळीच काळजी घेणे गरजेचे आहे.





(छाया : संतोष पेरणे)

# नेरळमध्ये भाजपकडून ध्वजवाटप

**कर्जत : बातमीदार**

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नेरळ गावातील सर्व घरांवर तिरंगा झेंडा फडकावा, यासाठी नेरळ शहर भाजपच्या वतीने नागरिकांना तिरंगा ध्वज भेट देण्यात आला.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी शासनाकडून हर घर झेंडा.. हर घर तिरंगा अभियान राबविले जात आहे. त्याचा भाग म्हणून नेरळ भाजपकडून तिरंगा ध्वजाचे वितरण करण्यात आले. त्यासाठी रायगड जिल्हा भाजप अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेरळ गावासाठी ५०० तर नेरळ भाजपने ५०० तिरंगा झेंडे आणले होते. भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष आणि नेरळचे उपसरपंच मंगेश म्हसकर यांच्या हस्ते जकात नाका येथून तिरंगा ध्वज वितरण कार्यक्रम सुरू करण्यात आला.

नेरळ बाजारपेठेमधील दुकानात जावून तसेच प्रत्येक वाटसरूंना भाजप कार्यकर्त्यांनी तिरंगा ध्वज वितरित केला. मंगेश म्हसकर यांच्यासह नेरळ भाजप अध्यक्ष अरुण नायक, माजी अध्यक्ष अनिल जैन, ग्रामपंचायत सदस्य राजन लोभी, संतोष शिंगाडे, भाजप युवा मोर्चाचे खेडकर, तसेच शंकलेश गदिया, प्रभाकर पवार, योगेश ठक्कर, राकेश तिवारी, प्रकाश पेमारे, गणेश गिर, विमल व्यास आदी कार्यकर्त्यांनी नेरळ गावात एक हजार तिरंगा झेंड्याचे वितरण केले.

# महाडमध्ये महिलांना स्वरक्षणाचे प्रशिक्षण

**महाड : प्रतिनिधी**



भाजपच्या बेटी बचाव बेटी पढाव या सेलच्या वतीने महाडमध्ये मुलींना स्वरक्षणाचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. तीन दिवसांचे हे प्रशिक्षण पुर्ण करणाऱ्या मुलींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

आजच्या स्पर्धेच्या युगात महिल आणि मुलींना शिक्षण आणि नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर पडावे लागते. त्यांना रात्री-अपरात्री प्रवास करावा लागतो. अशात काही संकट आले तर त्यातून कसा बचाव करायचा, याचे मोफत प्रशिक्षण भाजपच्या बेटी बचाव बेटी पढाव सेलच्या जिल्हा संयोजिका निलीमा राजेय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. शुक्रवार ते रविवार अशा तीन दिवस झालेल्या या स्वरक्षण प्रशिक्षणात अनेक मुलींनी सहभाग घेतला होता. विठ्ठल नातेकर आणि वैभव सकपाळ यांनी हे प्रशिक्षण दिले.

## भाजपचा 'बेटी बचाव बेटी पढाव' उपक्रम

भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, मंजुषा कुद्रीमोती, तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रश्मी वाझे, वाहतूक सेल अध्यक्ष नाना पोरे, डॉ. नितीन मिंडे, युवा मोर्चा सुमित पवार, शहर अध्यक्षा नमिता दोशी, आराधना इंगळे, प्रिया खोडके, अदिती ताडफळे, वृषाली साठे, विश्वतेज भोसले आदि मान्यवर या वेळी उपस्थित होते. प्रशिक्षण वर्ग यशस्वी करण्यासाठी तालुका संयोजिका कल्पना विचारे, प्राजक्ता दळवी, कोमल शेठ, नंदिनी मोरे, अभिषेक कुलकर्णी, वैदही साठे, मंजिरी कुलकर्णी, निकीता दळवी, सुनंदा माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

(छाया : महेश शिंदे)



# महाकाय कंटेनरमुळे मुंबई-पुणे महामार्गावर वाहतूक कोंडी

(छाया : अरूण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

पुण्याकडे जाणारा महाकाय कंटेनर खालापूर तालुक्यातील वावंढळ गावाजवळ आडवा झाल्याने गुरुवारी (दि.११) दुपारी मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती.

खालापूर तालुक्यातील चौक वावंढळ गावाजवळच्या अरुण हॉटेलसमोर पुण्याकडे जाणारा महाकाय कंटेनर गुरूवारी दुपारी महामार्गाच्या दोन्ही लेनवर आडवा झाला. त्यामुळे महामार्गावर वाहनांचा खोळंबा झाला. सुमारे एक तास वाहतूक कोंडी झाली होती. दरम्यान, खालापूर पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने कंटेनर बाजूला केल्यानंतर मुंबई व पुण्याकडे जाणारी वाहतूक सुरळीत झाली.







# माथेरानमध्ये भित्तिचित्रांचे प्रकाशन

**कर्जत : बातमीदार**

माथेरान नगर परिषद आणि शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील वीर हुतात्मा भाई कोतवाल शाळेत मंगळवारी (दि. ९) ऑगस्ट क्रांतिदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी नगरपालिकेच्या वतीने भित्तीचित्रे प्रकाशित करण्यात आली.

वीर हुतात्मा भाई कोतवाल शाळेच्या प्रांगणात सामूहीक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर पथनाट्ये सादर केली. मराठा समाजाच्या महिलांनी 'बल सागर भारत होवो' या गीतावर नृत्य सादर केले. प्राथमिक शाळेच्या प्रांगणात माथेरान गावाचे सुपुत्र आणि लष्करातील सुभेदार विनय धनावडे यांच्या प्रतिकृती शिल्पाचे अनावरण त्यांच्या आई रतन धनावडे व पत्नी सारिका धनावडे यांच्या हस्ते करण्यात आले.

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त विद्यार्थी आणि नागरिकांनी वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या निवासस्थानी जाऊन तेथे राष्ट्रगीताचे सामूहीक गायन केले. त्यानंतर हुतात्मा स्मारक (कम्युनिटी हॉल) येथे हुतात्मा भाई कोतवाल यांच्या तैलचित्रास माथेरान नगर परिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# कर्जतमध्ये घरावर झाड पडून नुकसान

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील डेक्कन जिमखाना परिसरातील तुषार खवणेकर यांच्या घरावर बुधवारी (दि. १०) रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास मोठे झाड कोसळले. या घटनेत घराचे नुकसान झाले आहे. मात्र दैव बलवत्तर म्हणून कुठलीही जीवितहानी झाली नाही.



(छाया : विजय मांडे)

तुषार खवणेकर हे गेल्या पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ कर्जत डेक्कन जिमखाना परिसरातील श्रीराम मेढी चाळीत राहत आहेत. त्यांच्या घराशेजारी सुमारे शंभर वर्ष जुने आंब्याचे झाड होते. खवणेकर कुंटूब बुधवारी रात्री झोपण्याच्या तयारीत असताना अचानक मोठा आवाज झाला आणि शेजारील आंब्याचे झाड कोसळून घरातील भिंत अर्धवट खाली आली, ही बाब तुषार यांची मुलगी तनू व विधी यांच्या लक्षात येताच त्यांनी घरातील इतर सदस्यांना घरावर झाड पडल्याची कल्पना दिली. सर्व कुंटुंब क्षणात घराबाहेर पडल्याने पुढील अनर्थ टळला तसेच झाड घराच्या भिंतीच्या आधारावर थांबले.

या घटनेचे वृत्त तहसीलदार विक्रम देशमुख यांना कळविले असता त्यांनी तातडीने नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक सुदाम म्हसे यांना सांगून कर्मचारी पाठवले. पण दुसऱ्या दिवशी गुरुवारीही नगर परिषेदच्या आपत्कालीन विभागाला झाड बाजूला काढण्यास अपयश आले. झाड अजुनही त्याच स्थितित आहे. तर महावितरण कंपनीचे अभियंता साबळे यांना कळवले असता त्यांनी तात्काळ कर्मचारी पाठवून वीजपुरवठा खंडित केला.

# कर्जतमध्ये आदिवासी संस्कृतीचे दर्शन

(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**



आंतरराष्ट्रीय आदिवासी दिनानिमित्त कर्जत तालुक्यातील आदिवासी समाजाच्या संघटनांनी मंगळवारी (दि. ९) जोरदार शक्तिप्रदर्शन केले. तालुक्यातील प्रत्येक आदिवासी वाडीमध्ये ग्रामस्थांनी बॅनरबाजी केली. आदिवासी दिनाचा आनंद साजरा करण्यासाठी आदिवासी समाज रस्त्यावर उतरल्याने काही ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

कर्जत तालुक्यातील १२आदिवासी संघटनांचे पदाधिकारी आणि आदिवासी समन्वय समिती यांच्या माध्यमातून मंगळवारी आंतराष्ट्रीय आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात आदिवासी समाजातील विविध कला पथकांचा कामडी, फुगडी नृत्य, टिपरी नृत्य, जंगली डान्स, टाळ्या वरचा नाच, संस्कृतीचे दर्शन घडवणारे नाच सादर करण्यात आले.

आदिवासी दिन उत्सव सोहळा समिती अध्यक्ष कांता पादीर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य सोहळा साजरा केला. या वेळी कर्जत तालुक्यात बाईकरॅली काढण्यात आली. नेरळ येथील कोतवालवाडी ट्रस्ट येथील स्तंभास हार अर्पण करून रॅलीला सुरुवात झाली. मोहाचीवाडी येथील नाग्या महादू कातकरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फलकास हार अर्पण करण्यात आला. नेरळमधील छत्रपती शिवाजी महाराज, हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. या वेळी पारंपारिक आदिवासी नाच सादर करण्यात आले. तसेच कळंब येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास हार अर्पण करून आदिवासी पारंपरिक नाच आणि कार्यक्रम सादर केली.

आदिवासी समाजाचे कार्यकर्ते नारायण डामसे, नारायण करोटे, मालू निरगुडा, भरत शीद, बाळकृष्ण पादीर, जैतू पारधी, बुधाजी हिंदोळा, जयवंती हिंदोळा, सुरेश निरगुडे, दादा पादीर आदिंनी आदिवासी दिन कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

# माणगावमध्ये आदिवासी दिन उत्साहात

## विविध क्षेत्रातील मान्यवर आदिवासी मित्र पुरस्काराने सन्मानित

**रोहा : प्रतिनिधी**

एकलव्य आदिवासी सामाजिक सेवा संस्थेतर्फे माणगावमधील कुणबी भवन येथे मंगळवारी (दि. ९) जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. या वेळी येरद आदिवासीवाडीतील युवतींनी पारंपारिक आदिवासी नृत्य सादर केले. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना आदिवासी मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



(छाया : महादेव सरसंबे)

जागतिक आदिवासी दिनानिमित्त माणगाव मोर्बा रोड ते कुणबी भवन अशी शोभायात्रा काढण्यात आली होती. विविध पारंपरिक वेशभूषा करून आदिवासी बांधव या शोभायात्रेत सहभागी झाले होते. त्या नंतर कुणबी भवनात झालेल्या कार्यक्रमात प्रा. सुनिल देवरे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी ज्येष्ठ समाजसेविका उल्का महाजन, पत्रकार महादेव सरसंबे, प्रफुल्ल पवार, मनोज घोसाळकर, शाम लोखंडे, वसंत भाऊ पाटील (चिरनेर, ता. उरण), ॲड. अनिकेत ठाकूर (देगाव माणगाव), शरद गांगल (महाड), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, वरिष्ठ संशोधन अधिकारी गजेंद्र केंद्रे (पुणे), प्रमोद जाधव, कृष्णा भोसले, भाई जाधव यांना आदिवासी मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने प्रांताधिकारी उमेश बिरारी यांनी पुरस्कार स्वीकारला.

माणगाव तहसीलदार प्रियांका आयरे, ओबीसी प्रवक्ते सुनील देवरे, संस्थेचे रायगड जिल्हा अध्यक्ष भिवा पवार, दिनेश कातकरी, महादेव कोळी, उमेश जाधव, बबन कोळी, राम कोळी, संजय कोळी यांच्यासह आदिवासी बांधव या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## उरण नगरपरिषद, उरण
## निविदा सूचना

जा.क्र. उनप/आरोग्य/१९१२/२०२२-२३
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : १०/०८/२०२२

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील घनकचरा केंद्र येथे कंपोस्टींग बेड पुरविणे. वार्षिक ठेकेदार नेमणेबाबत. | रु. २०००/- | रु. ५००/- |
| २ | उरण नगरपरिषद हद्दीतील तुंगेकर गार्डन पोलीस स्टेशन शेजारी छत्रपती शिवाजी महाराज बालोद्यान भवरा तलाव शेजारी कै. हरिश्चंद्र गावंड बालोद्यान बोरी पाखाडी, डॉ. आंबेडकर उद्यान या उद्यानामध्ये खेळणी बसविणे. | रु. २०००/- | रु. ५००/- |
| ३. | उरण नगरपरिषद हद्दीमध्ये आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत उपाययोजना करणेकरिता उरण नगरपरिषदेस जे.सी.बी., जे.सी.बी. ऑपरेटर पोकलेन, पोकलेन ऑपरेटर ब्रेकर, वुडकटर, मनुष्यबळ सेवा तसेच आपत्ती व्यवस्थापनाकरिता आवश्यक असणारी इतर अनुषंगीक हत्यारे अवजारे पुरविणे. | रु. २०००/- | रु. ५००/- |

**अटी/शर्ती :-**

१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक १२/०८/२०२२ ते दिनांक २५/०८/२०२२ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक १२/०८/२०२२ ते दिनांक २५/०८/२०२२ रोजीचे सायं. ४.०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोन लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक २६/०८/२०२२ रोजीचे दुपारी ४.०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५.०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

**सही/-**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण**



## जाहीर नोटीस

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस

श्री कुलस्वामी को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूद्ध थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीद्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दि. २२/०८/२०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वत: वा आपले प्रतिनिधीमार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| ११/२०२२-२३ | श्री. दिपक बाबासाहेब मोरे (श्री. गणेश ज्ञानदेव पांडुळे कर्जदार यांचे जामीनदार) | बालाजी आर्केड, रुम नं. १०६, बी विंग, फेज १, ऊसर्ली खुर्द, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. | ६३८२९/- |
| | श्री. संजय लल्ले यादव (श्री. गणेश ज्ञानदेव पांडुळे कर्जदार यांचे जामीनदार) | रुम नं. बी ३०२, महालक्ष्मी हौ. सोसा., रुपाली सिनेमासमोर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. | ६३८२९/- |
| १४/२०२२-२३ | श्री. मनोज नारायण बडगुजर (कर्जदार) | श्री कृष्णा कमलादेवी रेसीडन्सी, प्रभूआळी, जुने प्रांत ऑफीसजवळ, पहिला माळा, रुम नं. १०१, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. | १११८८७/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.

**जा.क्र.-१६३७/२०२२**
**स्थळ : पनवेल**
**दिनांक : ११/०८/२०२२**

शिक्का

**सही/-**
**(बा. ना. वाघमारे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड.**


## निवडक

### चिरनेरमध्ये आढळला अजगर



**उरण :** तालुक्यातील चिरनेर येथील शेतघरात भक्ष्याच्या शोधार्थ आलेल्या साडे नऊ फुट लांबीच्या इंडियन रॉक पायथॉन जातीच्या अजगरास वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांनी शिताफीने पकडून जंगलात सोडून दिले. उदय मोकल यांच्या शेतघराच्या बाजूला रविवारी रात्रीच्या सुमारास कोंबड्या आरडाओरडा का करतात हे पाहण्यासाठी अजगर संरक्षण संस्थेचे उपाध्यक्ष राजेश पाटील गेले असता त्यांना आढळला.

### अडकलेल्या कुत्र्यांना जीवदान



**पनवेल :** नदीमध्ये अडकलेल्या दोन कुत्र्यांचे जीव फायर ब्रिगेडच्या जवानांनी वाचवले आहेत. घोटकॅम्प येथून वाहणाऱ्या नदी पात्रात हा प्रकार घडला आहे. अभिमन्यू गोरे नावाचे इसम कामावरून घरी जात असताना त्यांना एका मच्छी विक्रेत्याने, समोरच्या नदीमध्ये दोन कुत्रे अडकल्याचे निदर्शनास आणून दिले. त्या वेळी अभिमन्यू गोरे यांनी खारघर अग्निशमन केंद्रात फोन करून संबंधित माहिती दिली. काही वेळातच फायर ब्रिगेडची टीम घटनास्थळी दाखल झाली. फायर ब्रिगेडच्या जवानांनी प्रयत्नांची शिकस्त करत त्या दोन कुत्र्यांना बाहेर काढून जीवदान दिले. खारघर अग्निशमन दलाच्या प्रवीण शेंद्रे, व्हि. एस. परदेशी, ए. एस. ससाणे, एस. वाय गावकर, जे. सी. राजपूत, आर. एन. म्हात्रे आदींच्या टीमने ही कामगिरी केली.



**मोहोपाडा : येथील दांड-आपटा मुख्य रस्त्यालगत अनधिकृतपणे गटारावर दुकान थाटण्याबरोबरच रस्त्यापर्यंत अतिक्रमण करत नागरिकांना नाहक त्रास देण्याचे काम फळविक्रेता करताना दिसत आहे, मात्र त्याच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.**

# नवी मुंबईत मोबाइल चोरांचे त्रिकूट अटकेत

### एक लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त



**पनवेल : वार्ताहर**

रस्त्यावरून मोबाइलवर बोलत जाणाऱ्याच्या हातातली मोबाइल हिसकावून पळ काढणाऱ्या तीन आरोपींच्या मुसक्या आवळण्यात मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा नवी मुंबईच्या पथकाला यश आले आहे. या मोबाईल चोरीप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना कोपरखैरणे येथून अटक केली आहे. या तीन आरोपीकडून एक लाख ३३ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या तीन जणांच्या टोळीने नवी मुंबई परिसरातील नेरूळ, एपीएमसी, वाशी, तुर्भे आणि एनआरआय पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाइल चोरी केल्याचे उघड झाले आहे.

नवी मुंबई शहरात मोबाइल स्नॅचिंग करून मोबाइलची चोरी करणाऱ्याच्या संख्येत गेल्या काही दिवसांपासून वाढ झाली होती. या वाढत्या चोरीवर आळा घालण्यासाठी विषेश मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले होते. या आदेशानुसार अश्या मोबाइल चोराचा शोध घेण्यास पोलिसांकडून सुरुवात करण्यात आली होती. या मोहिमेंर्तगत काम करताना मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर देवडे यांना गोपनीय सूत्रांकडून माहिती मिळाली होती की, दोन व्यक्ती कोपरखैरणे डी मार्टजवळ मोबाइलची विक्री करण्यास येणार असल्याची माहिती मिळाली होती. या मिळालेल्या माहितीनुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार मंगेश वाट, किरण राऊत, शशिकांत शेडगे, नितीन जगताप, राहुल वाघ, आणि अन्य पोलिसांनी कोपरखैरणे डी मार्ट परिसरात सापळा रचला होता, सापळा लावल्यानंतर काही अज्ञात व्यक्ती या परिसरात संशय रित्या फिरत असल्याचे पोलिसांना आढळून आले होते. या संशयितांची चैकशी केल्यानंतर, हे अज्ञात व्यक्ती उडवा उडवीचे उत्तर देऊ लागले होते. त्यामुळे या व्यक्तींवरील संशय अधिक बळावल्यानंतर आरोपीचा संशय अधिक बळावला आणि अधिक चौकशी केली असता या आरोपी कडून मोबाइल आढळून आले.

अधिक चौकशी केली असता हे मोबाइल चोरीचे असल्याचे आरोपीने कबूल केले आहे. आकाश कांबळे (वय २२, रा. कोपखैरणे), सिद्धेश शौर्य (वय २६, रा. कोपरखैरणे) आणि इम्रान शेख (रा. सीवूड्स, नेरूळ) अशी पकडलेल्या आरोपीची नावे आहेत. या आरोपीकडून जवळपास एक लाख ३३ हजाराचा ऐवज आरोपींकडून पोलिसांनी जप्त केला आहे. यामध्ये मोबाइल आणि दुचाकीचा समावेश आहे. हे आरोपी रस्त्यावरून मोबाइल वर बोलत चालणाऱ्या चाकरमान्यांच्या हातातील मोबाइल चोरून फरार होत होते.

## दीक्षा वर्तकचे वक्तृत्व स्पर्धेत यश



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत नवी मुंबई वाहतूक विभागातर्फे फुंडे येथे न्हावाशेवा पोलीस स्टेशनच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी विभागीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजची इयत्ता आठवीमध्ये शिकणारी विद्यार्थीनी दिक्षा रमेश वर्तक हिने विभागीय पातळीवर द्वितीय क्रमांक पटकाविला.

'रस्ते अपघातापासून स्वातंत्र्य मिळविण्यात माझे योगदान' या विषयावर केलेल्या भाषणात दीक्षा वर्तक या विद्यार्थ्यीनीने परीक्षकांसह उपस्थितांची मने जिंकली. या वेळी न्हावाशेवा वाहतूक शाखा नवी मुंबईचे पोलीस निरीक्षक नीरज चौधरी, उरण वाहतूक शाखा, नवी मुंबईचे पोलीस निरीक्षक अशोक गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. दिक्षा वर्तकची नवी मुंबई आयुक्तालय स्तरावर होणाऱ्या पुढील फेरीसाठी निवड झाली आहे. पुढील स्पर्धा विष्णुदास भावे नाट्यगृह येथे १२ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक भर्णुके,रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर आदींनी दिशाचे अभिनंदन केले आहे.

## आश्रमातील मुलांसोबत रक्षाबंधन

### खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुरुवारी (दि. ११) पनवेल तालुक्यातील नेरे (शांतीवन) या ठिकाणी भेट देऊन तेथील आश्रमात शिकणाऱ्या विद्यार्थांसोबत रक्षाबंधन सण साजरा केला व वही, पेन्सिल व इतर स्टेशनरीचे वाटप केले.

महाविद्यालयातील डी. एल.एल.ई. व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी या रक्षाबंधनाच्या कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी कार्यक्रमासाठी परवानगी दिली व मार्गदर्शन केले. आयोजन डी.एल.एल.ई. व राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत करण्यात असून विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. महेश धायगुडे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. रामकृष्ण टोपे, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. भाग्यश्री शुक्ला या सर्वांनी मेहनत घेतली.

या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी प्राध्यापकांचे कौतुक केले.



## पनवेलमध्ये आदिवासी दिनानिमित्त जनजागृती रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील मालडूंगे, धोदाणी, गाढेश्वर परिसरात मंगळवारी (दि. ९) जागतिक आदिवासी दिनानिमित्त मालडूंगे येथील हुतात्मा नाग्या महादू कातकरी चौक (आदिवासी क्रांतिकारक स्तंभ) येथे क्रांतीकारकांना मानवंदना करण्यात आले.

गाढेश्वर येथील ठाकूर समाजाचे क्रांतीकारक पद्या ठाकूर यांनीदेखील मानवंदना करून तालुक्यातील आदिवासी समाजाच्या वतीने मालडूंगे, धामणी, देहरंग, बापदेववाडी, धोदाणी व गाढेश्वर परिसरात बाईक रॅली काढण्यात आली. बाईक रॅलीनंतर धोदाणी येथे कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त करून समाजातील बांधवांना जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व पटवून दिले, तसेच गायिका उषा वारगडा यांनी प्रबोधनपर गीत गायले.

मालडूंगे ग्रामपंचायतीचे सहकार्य असल्याने सरपंच हर्षदा चौधरी यांच्यासह ग्रामपंचायतीचे विशेष आभार मानले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते पोलीस पदू दोरे, काळूराम वाघ, सी.के. वाक, सोमनाथ चौधरी, गणपत वारगडा, सिताराम चौधरी, धर्मा वाघ, महादू जाधव, राम भस्मा, चंद्रकांत सांबरी, संजय चौधरी, जनार्दन निरगुडा, पद्माकर चौधरी, सुनिल वारगडा, नारायण चौधरी, सिताराम वारगडा, रमेश भस्मा, आर. डी. वाक, जर्नादन घुटे, गौरव दरवडा, रवी पाटील, किरण ढुमणा, विलास भस्मा, अर्जुन घुटे, शाम चौधरी, राजाराम चौधरी आदी उपस्थित होते.

## मंगळागौरीतून पर्यावरण जागर

### पनवेलच्या संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे मंगळागौरीतून पर्यावरण जागर करून पर्यावरण रक्षणाचा संदेश सख्यांना देण्यात आला. नागोठणे, उरण, अलिबाग, मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील ६० सख्यांनी या मध्ये सहभाग घेतला या वेळी आयोजित करण्यात आलेल्या उखाणा स्पर्धेचे अरुणा बने, मनिषा आपटे आणि वैशाली थोरात विजेते ठरले.

श्रावण आणि मंगळागौर याचे अतूट नाते आहे आणि अश्या ह्या मंगळागौरीचे आयोजन गेले १२ वर्ष संवेदना चॅरिटेबल संस्था करत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मंगळवारी (दि. ९) पनवेल येथील सुरुचि हॉलमध्ये इंद्रधनू रंगानी रंगलेला मंगळागौरीचा कार्यक्रम पनवेल नगरीत झाला. पनवेलसोबतच नागोठणे, उरण, अलिबाग, मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील सख्यांनी नऊवारी साज लेवून उत्साहाने भाग घेतला.

या वेळी आयोजित करण्यात आलेल्या उखाणा स्पर्धेत अरुणा बने, मनिषा आपटे आणि वैशाली धोरात यांना बक्षिसे देण्यात आली. मंगळागौर हे महिलांना रोजच्या धकाधकीच्या जीवनातील मनाला प्रफूल्लीत करणारा बुस्टर डोस आहे, कारण आलेल्या सख्या येथून जाताना आनंदाचा ठेवा घेऊनच जातात आणि हाच ठेवा बरेच दिवस प्रत्येकीच्या रोमारोमात भिनलेला असतो, असे मत या वेळी संस्थेच्या आध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी व्यक्त केले.

या मंगळागौरीच्या कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्ष सुनेत्रा गवाणकर, उपआध्यक्ष प्रज्ञा गावडे, खजिनदार आरती दामले, नंदा घोडींदे, ज्योती मोघे, अरुणा बने संस्थेतील इतर सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.





## गणेश मूर्तिकारांची लगबग सुरू

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा गावातील कुंभार समाजाचे जुन्या पिढीतील मूर्तीकार नारायण वाडेकर व त्यांच्या पत्नी सुमती वाडेकर हे त्यांची मूर्तीकला आजही जपत आहेत. वयाची पंच्याहत्तरीतसुद्धा मूर्ती बनवत आहेत. सध्या त्यांची गणेशमूर्ती बसनविण्यासाठी लगबग सुरू आहे.

गावातील तरुण पिढीतील कलाकार प्रसाद टेंबे हे शाडूच्या मूर्ती करून लोकांच्या आवडीप्रमाणे करून देतात. टेंबे यांच्या मूर्ती बाहेरच्या देशातही पाठविल्या जातात. यंदाही मूर्तींची किंमत वाढलेली आहे. रंग, मजुरी व शाडूच्या मातीचा दर वाढलेला असल्याने ही भाववाढ झाली आहे. आपटा हे एक खेडे असूनही गावातील लोक त्यांची कला जपत आहेत. अपुरी साधने, मनुष्यबळ कमी तरीही दरवर्षी हे कलाकार आपली कला व संस्कृती जपत आहेत.

## डॉ. एस. आर. रंगनाथन् जयंतीनिमित्त अभिवादन



**पनवेल : वार्ताहर**

डॉ. एस. आर. रंगनाथन् हे एक भारतीय गणितज्ञ आणि पुस्तकालयतज्ञ होते. २३ भारतीयांमध्ये वाचनसंस्कृती अधिकाधिक रुजावी यासाठी डॉ. रंगनाथन् यांनी ग्रंथालयशास्त्र आणि त्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. ९) येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयात अभिवादन करण्यात आले.

सर्वप्रथम संस्थेच्या अध्यक्षा सुनिता जोशी यांनी प्रास्ताविक केले. संस्थेच्या सहकार्यवाह जयश्री शेटे व कार्याध्यक्ष विनायक वत्सराज यांनी डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पाहार अर्पण केला. संस्थेचे कार्याध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्याविषयी सविस्तर माहिती दिली. ग्रंथालयाचे सदस्य राजकुमार ताकमोगे यांनी आपल्या भाषणात ग्रंथालय चळवळीविषयी सांगून लिमये सार्वजनिक वाचनालयाच्या सक्रिय सहभागाविषयी विवेचन केले.

या कार्यक्रमास ग्रंथपाल निकिता शिंदे, कार्यकारिणी सदस्य रमेश चव्हाण, वाचक वर्गापैकी रत्नाकर कुलकर्णी, हसन दमडे, ॲड. धाडस भोपी, वसंत कोंडेकर व नागरिक उपस्थित होते.




### अवखळ पाऊस..

अरे नाच नाच नाच अवखळ पावसा
वाऱ्यानेही तुझ्यासंगे फेर धरिला...

थेंब येता खाली
शेते चिंब न्हाली
माणिक मोती लेवून
धुदफुंद झाली
हिरव्या हिरव्या शालूवरी शोभे कशिदा...

भरले नदी नाले
भिजली पाने फुले
पंख होता ओले
डोळे मिटून गेले
गार गार गारवा झोंबे अंगाला

डोंगर माथ्यावर
गच्च हिरवी झाडी
काळ्या ढगांची झाली
नवी झिम्मा फुगडी
थेंब थेंब टपोरे मिळती ओहळा...

बाळे भिजूनी गेली
अंगे शहारली
फुला पानांनाही
नवी जाग आली
फुलाफुलातही नवी रंग भरला



-अलका वैशंपायन,
पनवेल

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

## कर्जतमध्ये ध्वज खरेदीसाठी गर्दी

**कर्जत : बातमीदार**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त कर्जत नगर परिषद हद्दीमध्ये हर घर झेंडा... हर घर तिरंगा अभियान राबवले जात आहे. त्यासाठी नगर परिषदेतर्फे प्रभागनिहाय जनजागृती रॅली

तसेच तिरंगा ध्वज विक्री स्टॉल लावण्यात आले आहेत. दरम्यान, शहरातील एक हजाराहून अधिक नागरिकांनी तिरंगा ध्वज विकत घेतले आहेत. दरम्यान, बुधवारी (दि. १०) शहरातील दहिवली, आकुर्ले, गुंडगे आणि भिसेगाव भागात शालेय विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त रॅली काढून जनजागृती केली.

नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधी, पालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्जत शहरात हर घर

(छाया : संतोष पेरणे)



तिरंगा अभियान राबविण्यास सुरुवात केली आहे. नगरपालिकेने शहराती सर्व प्रभागात ध्वज विक्री केंद्रे सुरू केली आहेत. त्यात पाच हजार तिरंगा ध्वज विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. आतापर्यंत १४३५ ध्वजाची विक्री झाली आहे.

कर्जतमध्ये हर घर झेंडा... हर घर तिरंगा अभियान यशस्वी करण्यासाठी शहरातील अभिनव प्रशाला, डोंबे विद्या निकेतन, जनता विद्यालय, रायगड जिल्हा परिषदेच्या शाळा तसेच इंग्लिश मिडीयम स्कूल, कन्या शाळा, डॉन बॉस्को आदी शाळांकडून शहरातील प्रत्येक भागात जनजागृती रॅली काढल्या जात आहेत.

बुधवारी दहिवली, आकुर्ले, गुंडगे आणि भिसेगाव भागात विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली होती. भिसेगाव येथील रॅलीमध्ये नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, नगरसेविका पुष्पा दगडे, सोमनाथ ठोंबरे तर गुंडगे भागातील रॅलीमध्ये नगराध्यक्षा जोशी, मुख्याधिकारी सुरेखा भणगे, नगरसेवक उमेश गायकवाड, वैशाली मोरे तसेच पालिकेचे आरोग्य निरीक्षक सुदाम म्हसे, बांधकाम विभागाचे रवी लाड, अविनाश पवार, कल्याणी लोखंडे, रुचिता शिंदे सहभागी झाले होते.

## रोह्यात नगर परिषदेच्या वतीने जनजागृती



(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सूचनेनुसार हर घर तिरंगा या उपक्रमाविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याकरिता रोहा नगर परिषदेच्या वतीने बुधवारी (दि. १०) सकाळी शहरात रॅली काढण्यात आली होती.

रोहा नगर परिषद कार्यालय येथून या जनजागृती रॅलीला प्रारंभ झाला. विविध घोषवाक्यांचे फलक, स्वातंत्र्यसेनानींच्या प्रतिमा हातात घेत विद्यार्थी या रॅलीत सहभागी झाले होते. ही जनजागृती रॅली दमखाडी, मेहेंदळे हायस्कूल, राम मारुती चौक, बाजारपेठ मार्गे पुन्हा नगर परिषद कार्यालयात आली. तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला. मुख्याधिकारी धीरज चव्हाण, नायब तहसीलदार राजेश थोरे, माजी नगरसेवक अहमद दर्जी, समिर सकपाळ, महेंद्र दिवेकर, रवी चाळके, नगर परिषद अधिकारी निवास पाटील, रुपेश पाटील, नितीन शिंदे यांच्यासह नगर परिषद कर्मचारी, नागरिक, पत्रकार, व्यापारी तसेच विविध सामाजिक संस्था, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी या जनजागृती रॅलीत सहभागी झाले होते.

(छाया : विनायक माडपे)



## केएमसी महाविद्यालयात विविध उपक्रमांचा शुभारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित खोपोलीतील केएमसी महाविद्यालयात ९ते १७ऑगस्ट दरम्यान स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्ताने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याचा शुभारंभ संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ९) करण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील यांच्या हस्ते मंगळवारी ध्वजारोहण करण्यात आले. एनसीसीच्या दिव्या नाईक यांनी रिपोर्टिंग केले. त्यानंतर राष्ट्रगीत, ध्वजगीत, देशभक्तिपर गीते सादर करण्यात आली. प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, उपप्राचार्य डॉ. विनायक गांदल, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. संजय डायरे, डॉ. ए. बी. पाटील, प्रा. मीनाक्षी ओसवाल, ग्रंथपाल चेतन सोनावणे, एनसीसीचे प्रमुख प्रा. शितल गायकवाड यांच्यासह महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक– प्राध्यापिका, एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्ताने केएमसी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमात स्वच्छता मोहीम, व्याख्यान, वृक्षारोपण, प्रभात फेरी, देशभक्तीपर कार्यक्रम, निबंध व घोषवाक्य स्पर्धा यांचा समावेश आहे.

## माणगावातील वडघर मुद्रे येथे विविध स्पर्धा

(छाया : सलीम शेख)





**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ– कल्याण या संस्थेच्या वडघर मुद्रे (ता. माणगाव) येथील सरस्वती विद्यामंदिर तथा कैलासवासी शंकर सीताराम देशमुख विद्या संकुलात कै. सुभाष देशमुख यांच्या द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त नागरिक सेवा फाउंडेशनतर्फे विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्याचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी झाला.

कै. सुभाष देशमुख यांनी स्वतःची नोकरी सांभाळून या पंचक्रोशीतील मुलांना दहावीपर्यंत शिक्षण घेता यावे म्हणून मोठ्या कष्टाने ही शाळा, हे संकुल उभे केले आहे. शाळेची गुणवत्ता टिकावी यासाठी त्यांनी जीवनाच्या शेवटपर्यंत लक्ष दिल्याचे संस्थेचे संस्थापक डॉ. दीपक देशमुख यांनी या वेळी सांगितले. विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक राजन पाटील यांनी केले. या वेळी हस्ताक्षर स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे व दहावीमध्ये ७५टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी विद्यालयाच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या शिर्के यांनी केले. संस्थेचे सल्लागार संजय गांधी, अध्यक्ष रत्नदीप आमरे, सचिव भालचंद्र खाडे, बाबाजी रिकामे, पोलीस पाटील मनोहर धुमाळ, सरपंच पुष्पा साळवी यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते. सुरेश भेदाटे यांनी आभार मानले.

## नेरळच्या टिपणीस महाविद्यालयात तिरंगा सप्ताह

**कर्जत : बातमीदार**

हर घर झेंडा... हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत नेरळच्या मातोश्री टिपणीस महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ९ते १७ऑगस्ट या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि. १०) हर घर तिरंगा उपक्रमच्या जनजागृती साठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालय ते ममदापूर तसेच नेरळ परिसरात रॅली काढली होती.





मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयात हर घर झेंडा.. हर घर तिरंगा अभियान राबविले जात आहे. त्यानिमित्ताने महाविद्यालयात सामूहीक राष्ट्रगीत गायन करण्यात आले. तसेच वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात एकूण१४विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. वक्तृत्व स्पर्धेत वंदना थोराड (एसवायबीए) हिने प्रथम, विना सुपेकर (टीवायबीकॉम) हिने द्वितीय आणि सागर सपकाळे याने तिसरा क्रमांक पटकावला. प्रा. सागर मोहिते, प्रा. संतोष तुरुकमाने, प्रा. स्नेहल देशमुख, प्रा. अमोल सोनावणे, प्रा. सोनम गुप्ता, प्रा. अनंत घरत, प्रा. विकास घारे, प्रा. वैभव बोराडे, प्रा. धनंजय कोटांगळे, ग्रंथपाल जागृती घारे, आरती आवटे, दिपक जोशी यांनी या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

१७ ऑगस्टपर्यंत महाविद्यालयात गीत गायन, समूह गीत गायन, पोस्टर, रंगवली आदि स्पर्धा, आरोग्य शिबिर यासह संगणक प्रशिक्षण दिले जाणार आहे. तर इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांचे व्याख्यान होणार आहे.

## मुरूडमध्ये सर एस.ए. हायस्कूलची फेरी

(छाया : संजय करडे)

**मुरुड : प्रतिनिधी**

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त मुरूड येथील सर.एस.ए.हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी मंगळवारी (दि. ९) हायस्कूलच्या पटांगणावर समूह गान केले. त्यानंतर जनजागृती रॅली काढून गणेश पाखाडी येथील क्रांतीस्तंभाजवळ स्वातंत्र्यविरांना मानवंदना दिली. या वेळी हायस्कूलचे संचालक प्रमोद भायदे यांच्या हस्ते क्रांतीस्तंभाला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

मुरूडचे नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे, मंडळ अधिकारी राठोड, माजी नगरसेवक पांडुरंग आरेकर, मुख्याध्यापक सरोज राणे, प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर, शाळेचे शिक्षक, शिकेत्तर कर्मचारी या वेळी उपस्थित होते.



## रातवड विद्यालयात दीपोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त छत्रपती शिक्षण मंडळ– कल्याण या संस्थेच्या रातवड येथील माध्यमिक विद्यामंदिर विद्यालयात दीपोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी संपूर्ण वंदे मातरम गीताचे गायन करून दीपोत्सवाच्या प्रकाशात शारदा स्तवन गायले.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माणगाव तालुक्यातील रातवड विद्यालयात अमृत महोत्सवी पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत १ऑगस्टपासून विद्यालयात विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध, चित्रकला, घोषवाक्य आदी स्पर्धा, पथनाट्य, वैयक्तिक गीत गायन, दीपोत्सव, पारंपारिक वेशभूषा इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित केलेल्या दीपोत्सवासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने घरून एक दिवा आणला होता. विद्यालयाच्या सभागृहात भारताचे मानचित्र रेखाटून त्यामध्ये विद्यार्थ्यांनी आकर्षक अशी पणत्यांची सजावट केली. फुले पाने व विविध नैसर्गिक वस्तूंचा वापर करून मानचित्र सजविले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी संपूर्ण वंदे मातरम गीत आणि शारदा स्तवन सादर केले. या दीपोत्सवानिमित्ताने विद्यालयात पारंपारिक वेशभूषेचे आयोजन करण्यात आले होते.

चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे आणि घोषवाक्यांचे प्रदर्शन विद्यालयाच्या सभागृहात मांडण्यात आले आहे. मुख्याध्यापक महादेव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख मनोहर पुरी, अजित शेडगे, अमोल तोडकर यांच्या संकल्पनेतून रातवड विद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असून त्यात विद्यालयातील २३० विद्यार्थी व ११ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले आहेत.

## भाजप युवा मोर्चाची रोह्यात बाईक रॅली

(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

हर घर तिरंगा या अभियानाअंतर्गत रोह्यात दक्षिण रायगड भारतीय जना युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. १०) बाईक रॅली काढण्यात आली होती. रोहा शहर ते कोलाड नाका या परिसरात फिरून या रॅलीतील युवकांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाबाबत जनजागृती केली.



सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोशन चाफेकर, राजमुद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष तथा रोहा तालुका युवा मोर्चाचे अध्यक्ष राजेश डाके, डान्स क्रिएटिव्ह ॲकॅडमीचे अध्यक्ष अनिल शेलार यांनी या बाईक रॅलीचे आयोजन केले होते. रोहा शहरातील राम मारुती चौक येथील परमपुज्य पाडुरंगशास्त्री आठवले, स्वातंत्र्यविर सावकर, स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री चिंतामराव देशमुख यांना पुष्पहार अर्पण करून या रॅलीला सुरुवात करण्यात आली. राम मारुती चौक येथून तीनबत्ती नाका, एसटी बस स्थानक, नगर परिषद कार्यालय, दमखाडी, वरसे, एक्सेल स्टॉप, धाटाव, किल्ला, संभे मार्गे ही बाईक रॅली कोलाड नाक्यावर आली. तेथे या रॅलीची सागंता करण्यात आली. रॅलीत भारत माता की जय, वंदे मातरम व अमर जवान तुझे सलाम अशा घोषणा देण्यात येत होत्या.

युवा मोर्चाचे जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, रोहा तालुका सरचिटणीस अविनाश कान्हेकर, शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, भाजपचे रोहा तालुका उपाध्यक्ष शिवाजी जाधव, धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, सोशल मीडिया सेलचे जिल्हा संयोजक सनील ईगावले, सरपंच रघुनाथ कोस्तेकर, शिवानी भांड, राजेश भगत, सागर डाके, धर्मा कोकरे, संकेत मोरे, दिप वायडेकर यांच्यासह भाजप व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या बाईक रॅलीत सहभागी झाले होते.

## नेरळमध्ये लेझीम पथकाचे संचलन

**कर्जत : बातमीदार**

हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत विद्या विकास मंडळ या संस्थेच्या नेरळ येथील विद्या विकास मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर नाचत तिरंगा रॅली काढून जनजागृती केली.





नेरळ गावातील विद्या विकास मंदिर या शाळेत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त हर घर झेंडा हर घर तिरंगा अभियान राबविले जात आहे. त्यानिमित्ताने मुख्याध्यापिका शैलजा निकम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझिम आणि ढोल–ताशाच्या तालावर हातात तिरंगा घेवून नेरळ गावात जनजागृती रॅली काढली होती. बाजारपेठ भागातील चौकात लेझिम पथकाचे संचलन झाले. शाळेच्या इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका स्नेहा म्हसे, ज्येष्ठ शिक्षिका नीलाक्षी सुर्वे, रेखा काळे, यशस्विनी सहस्त्रबुद्धे, ललिता बदे, नितीन सुपे, कोमल पळसकर, स्नेहल बदले, कांचन नाईक, रोहिणी कुडतरकर, बालवाडी विभागाच्या अस्मिता पवार, सीमा दिघे, स्वाती तुपगावकर यांच्यासह विद्यार्थी या जनजागृती रॅलीत सहभागी झाले होते.

## चौक येथे रविवारी व्याख्यान

**खालापूर : प्रतिनिधी**

भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने चौक येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या सभागृहात रविवारी (दि. १४) दुपारी २वाजता 'करिअर निवडताना' या विषयावर स्तंभलेखक सुहास पाटील (निवृत्त सहाय्यक आयुक्त) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र लोक सेवा आयोग परीक्षेत ओबीसी महिला प्रवर्गातून प्रथम आलेल्या सायली श्याम ठाकूर (नेरे, ता. पनवेल) यांचा या वेळी सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन चौक ज्येष्ठ नागरिक संस्थेचे यशवंत सकपाळ यांनी केले आहे.

# वनडे सिरीजसाठी टीम इंडिया सज्ज

## शिखर धवनच्या नेतृत्वाखाली १८ ऑगस्टपासून रंगणार सामने

**मुंबई : प्रतिनिधी**

वेस्ट इंडिज दौरा संपल्यानंतर टीम इंडिया आता लवकरच झिम्बॉब्वे दौऱ्यावर रवाना होणार आहे. भारत या सिरीजमध्ये तीन वनडे सामन्यांची मालिका खेळणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली या दिग्गजांच्या अनुपस्थितीत संघाचे नेतृत्व शिखर धवनकडे सोपवण्यात आले आहे.

आशिया कप स्पर्धेआधी ही सिरीज टीम इंडियासाठी महत्त्वाची आहे. या सिरीजच्या माध्यमातून वेगवान गोलंदाज दीपक चहर पुनरागमन करीत आहे. धवनने वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत यशस्वी नेतृत्व केले. मी भारतासाठी जोपर्यंत खेळेन, तोपर्यंत टीमसाठी उपयुक्त राहिन. मला संघावर ओझ बनायचे नाही, असे शिखर



धवन म्हणाला होता.

टीमच्या नेतृत्वाबद्दल विचारण्यात आलेल्या प्रश्नावर तो म्हणाला की, माझा माझ्या गोलंदाजांवर विश्वास आहे. टॉप लेव्हलवर खेळताना सगळेच व्यावसायिक असतात. सगळ्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव असते. गोलंदाजांची रणनिती चालली नाही, तर आमच्याकडे दुसरी योजना तयार असते, असेही त्याने सांगितले.

ही सिरीज आयसीसी पुरुष वर्ल्ड कप सुपर लीगचा भाग आहे. पुढच्या वर्षी भारतात वनडे वर्ल्ड कप होणार आहे. या स्पर्धेत प्रवेश मिळवण्याचा हा एक मार्ग आहे. भारताने २०१६मध्ये शेवटचा झिम्बॉब्वे दौरा केला होता. एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली टीमने तीन वनडे आणि तीन टी-२० सामने खेळले होते.

**झिम्बॉब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघ :** शिखर धवन (कॅप्टन), ऋतुराज गायकवाड, शुभमन गिल, दीपक हुड्डा, राहुल त्रिपाठी, ईशान किशन (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), वाशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकुर, कुलदीप यादव, अक्षर पटेल, अवेश खान, प्रसिद्ध कृष्णा, मोहम्मद सिराज, दीपक चहर.

# तीन वर्षांनंतर नागपुरात रंगणार आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना

**नागपूर : प्रतिनिधी**

भारत आणि ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघादरम्यान तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेतील दुसरी लढत येत्या २३ सप्टेंबर रोजी विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या जामठा स्टेडियमवर खेळली जाणार आहे. या सामन्याच्या निमित्ताने तब्बल तीन वर्षांनंतर नागपुरात आंतरराष्ट्रीय सामना होणार आहे.

बीसीसीआयने अलिकडेच ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेचा कार्यक्रम घोषित केला. २० सप्टेंबरला मोहाली येथे पहिला सामना झाल्यानंतर २३ तारखेला नागपुरात दुसरा टी-२० सामना रंगणार आहे. तब्बल तीन वर्षांच्या दीर्घ



कालावधीनंतर आंतरराष्ट्रीय सामना होणार असल्याने नागपूरकर क्रिकेटप्रेमींसाठी एकप्रकारे मेजवानी राहणार आहे. ४५ हजार प्रेक्षक क्षमता असलेल्या जामठा स्टेडियममध्ये आतापर्यंत १२ पुरुषांचे व दोन महिलांचे टी-२० सामने खेळले गेले आहेत. नागपुरात शेवटचा टी-२० सामना भारत आणि बांगलादेश यांच्यात नोव्हेंबर २०१९मध्ये खेळला गेला होता.



# पेण येथे राज्यस्तरीय एल्बो बॉक्सिंग सेमिनार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने क्रीडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत महाराष्ट्र एल्बो बॉक्सिंग असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पेण येथे रायगड एल्बोबॉक्सिंग असोसिएशन यांच्यामार्फत राज्यस्तरिय एल्बोबॉक्सिंग सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या सेमिनारमध्ये धुळे, जळगाव, नाशिक,पुणे, नंदुरबार व रायगड येथून जवळजवळ ४२ जणांनी सहभाग घेतला. या सेमिनारद्वारे हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगाचा संदेश देण्यात आला. या सेमिनारचे उद्‌घाटन युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी केले. या सेमिनारमध्ये सर्व प्रशिक्षणार्थींना महाराष्ट्र एल्बोबॉक्सिंगचे अध्यक्ष सुरेश कोळी, सागर कोळी, संदीप माने यांनीही मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक तसेच पेण तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांनी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले. हा संपूर्ण सेमिनार रायगड एल्बोबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष रविंद्र म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

# रसायनीतील स्पर्धकांचे जम्प रोप स्पर्धेत सुयश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा आणि पनवेल शहर जम्प रोप असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दुसऱ्या जिल्हास्तर जम्प रोप अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन पनवेल जम्प रोप असोसिएशनच्या अध्यक्षा स्मिता पनवेलकर व सचिव प्रतिक कारंडे यांनी नवीन पनवेल येथे केले होते. या स्पर्धेत रसायनीतील स्पर्धकांनी सुयश प्राप्त केले आहे.

या स्पर्धेमध्ये एकूण १८० खेळाडू सहभागी झाले होते. यात निलेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सूकापूर शाखेने वर्षी प्रथम विजेतेपद तर प्रशांत गांगर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली आकुर्ली शाखेने द्वितीय पारितोषिक, मनीष पनवेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन



पनवेल संघाने तृतीय पारितोषिक आणि संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी संघाने चतुर्थ पारितोषिक पटकावले.

यात रसायनी येथील संजय काशिनाथ पाटील यांच्या विद्यार्थ्यांनी चार सुवर्णपदक, दोन रौप्य व दोन कांस्यपदक पटकावले. यात विनायक पाटील, भावार्थ धुमाळ, अनुसया कदम व कादंबरी चौधरी यांनी सुवर्ण, ऋषभ मोरे व आर्यन दिलोड यांनी रौप्य व स्वरूप पाटील, ज्ञानेश्वर कदम यांनी कांस्यपदक पटकावले.

सर्व विजेत्या स्पर्धकांची २७ व २८ ऑगस्ट रोजी नंदुरबार येथे होणाऱ्या राज्यस्तरीय जम्प रोप स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या वेळी युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष आणि जम्प रोप असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी विजयी संघांचे अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# विल स्मीडने ‘द हंड्रेड’ स्पर्धेत ठोकले पहिले शतक

**इंग्लंड : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये सध्या द हंड्रेड स्पर्धा सुरू आहे. १०० चेंडूंच्या या स्पर्धेत दोन्ही संघ प्रत्येकी १०० चेंडू खेळतात. हा क्रिकेट फॉरमॅट टी-२० आणि टी-१० यांच्या मधला फॉर्मेट आहे. या क्रिकेट फॉर्मेटमध्ये शतक ठोकणे सहज शक्य नाही. इंग्लंडचे जोस बटलर, लियाम लिव्हिंगस्टोन, जॉनी बेअरस्टो, मोईन अली असे तगडे खेळाडू या स्पर्धेत खेळत आहेत, मात्र यापैकी एकालाही शतक ठोकता आले नाही. ही ऐतिहासिक कामगिरी २० वर्षीय विल स्मीडने केली.

इंग्लिश क्रिकेटर विड स्मीडने बुधवारी (दि. १०) खेळल्या गेलेल्या द हंड्रेड स्पर्धेतील एका सामन्यात नाबाद शतकी खेळी करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. याचबरोबर तो द हंड्रेड स्पर्धे



त शतक ठोकणारा पहिला फलंदाजही ठरला. हा सामना बर्मिंगहॅम फिनिक्स आणि सदर्न ब्रेव यांच्यामध्ये खेळला गेला. फिनिक्सने हा सामना ५३ धावांनी जिंकला. फिनिक्सकडून खेळणाऱ्या स्मीडने सलामीला येत ५० चेंडूत नाबाद १०१ धावा केल्या. या खेळीत त्याने सहा षटकार आणि आठ चौकार लगावले. या खेळीदरम्यान स्मीडचा स्ट्राईक रेट हा २०२ इतका होता.

दरम्यान, विल स्मीडच्या या दमदार खेळीच्या जोरावर फिनिक्सने चार बाद १७६ धावा केल्या. मोईन अली फिनिक्स संघाचा कर्णधार आहे. या संघात लियाम लिव्हिंगस्टोन आणि मॅथ्यू वेडसारखे टी-२० स्टार खेळाडूदेखील आहे. तरीदेखील स्मीड द हंड्रेड स्पर्धेत पहिले शतक ठोकण्याचा मान पटकावला.

# भारतीय बॅडमिंटनपटूंसमोर खडतर आव्हान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये पदके जिंकणाऱ्या भारतीय बॅडमिंटनपटूंसमोर २२ ऑगस्टपासून टोकियोत सुरू होणाऱ्या जागतिक स्पर्धेमध्ये खडतर आव्हान असणार आहे. या स्पर्धेचा ड्रॉ बुधवारी (दि. १०) जाहीर करण्यात आला. या वेळी भारतीय खेळाडूंना कठीण ड्रॉचा सामना करावा लागणार आहे. पी. व्ही. सिंधू हिने २०१९मध्ये जागतिक स्पर्धा जिंकण्याचा पराक्रम करून दाखवला होता. यंदा तिला ही स्पर्धा जिंकण्यासाठी प्रचंड मेहनत करावी लागणार आहे. सिंधूला सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये हॅन यूए व वँग झी ई या दोन खेळाडूंचा सामना करावा लागणार आहे. त्यानंतर दक्षिण कोरियाच्या न सी यंग हिच्याशी तिला दोन हात करावे लागणार आहेत.

साईना नेहवालला हाँगकाँगच्या च्युअँग यी हिचा



सामना करावा लागणार आहे. या लढतीत विजय मिळवल्यास साईनाला पुढील फेरीत जपानच्या नोझोमी ओकुहरा हिचे कडवे आव्हान असणार आहे. मालविका बनसोड या भारताच्या महिला बॅडमिंटनपटूसमोर डेन्मार्कच्या लाईन ख्रिस्तोफरसन हिचा अडथळा असणार आहे.

पुरुषांच्या एकेरीतही किदांबी श्रीकांत, लक्ष्य सेन व एच. एस. प्रणॉय हे भारतीय खेळाडू एकाच हाफमध्ये आहेत. त्यामुळे भारताचा एकच खेळाडू उपांत्य किंवा अंतिम फेरीपर्यंत आगेकूच करू शकणार आहे. याशिवाय बी. साईप्रणीत हा भारताचा चौथा पुरुष खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाला आहे.

# ऋषभ पंत उत्तराखंडचा ब्रँड ॲम्बेसेडर

## मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंत याची उत्तराखंड सरकारने आपल्या राज्याचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड केली आहे. तरुणांना क्रीडा आणि सार्वजनिक आरोग्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने ही जबाबदारी ऋषभ पंतवर सोपवली आहे.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी दिल्लीतील उत्तराखंड सदनात पंत याच्यासोबत गुरुवारी (दि. ११) फोनवर संवाद साधला. ऋषभ पंत हा मूळचा उत्तराखंडचा रहिवासी आहे. तो हरिद्वार जिल्ह्यातील रुरकी येथे वाढले आणि तेथेच त्यांचे शिक्षण झाले. तो दिल्लीतून रणजी खेळायचा. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी स्वतः ट्विट करून पंत यांची राज्याचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड झाल्याची माहिती दिली. त्यांनी लिहिले, ‘उत्तराखंडमधील तरुणांना क्रीडा आणि सार्वजनिक आरोग्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने देवभूमीचे सुपुत्र आणि भारतीय क्रिकेट संघाचा प्रतिभावान खेळाडू ऋषभ पंत यांची राज्य सरकारने राज्य ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्याचा निर्णय घेतला आहे. आपणांस शुभेच्छा!’

या खेळाडूने वयाच्या २४व्या वर्षी टीम इंडियाची कमानही सांभाळली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या



पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत ऋषभ पंतकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. पंत आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार आहे.

पंतने आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करून हे नाव कमावले आहे. यामुळे आता त्याला मोठी जबाबरादीर मिळाल्याने त्याचीही जबाबदार वाढली आहे. पंतच्या आधी त्याचा गुरू महेंद्रसिंग धोनीही या राज्याचा ब्रँड ॲम्बेसेडर राहिला आहे.





**पनवेल : रक्षाबंधनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना गुरुवारी त्यांच्या बहिणींनी राखी बांधत रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला. या वेळी भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्यासह अन्य भगिनी उपस्थित होत्या.**

# मुंबई इंडियन्सने लाँच केले दोन नवीन संघ

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमधील सर्वात यशस्वी संघ असलेल्या मुंबई इंडियन्स फ्रेंचायजीने आणखी दोन नवीन संघ लाँच केले आहेत. हे दोन्ही नवीन संघ यूएई आणि दक्षिण आफ्रिकेतील लीगमध्ये आपला खेळ दाखवतील. मुंबई फ्रेंचायजीची मालकी रिलायन्स इंडस्ट्रीजकडे आहे. मुंबई इंडियन्सने आता यूएई आणि दक्षिण आफ्रिका टी-२० लीगमध्ये मुंबई अमीरात आणि मुंबई केपटाऊन नावाने २ नवीन संघ लाँच केले आहेत.

मुंबई इंडियन्सने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेयर केलाय. यात दोन्ही संघांच्या नावांची घोषणा केली आहे. अमीरात आणि केपटाऊन दोन्ही संघ मुंबई इंडियन्स कुटुंबाचा भाग आहेत. दोन्ही संघांची जर्सी मुंबई इंडियन्सशी मिळती-जुळती असेल. म्हणजेच दोन्ही टीम्सच्या जर्सीमध्ये ब्लू आणि गोल्डन रंग पहायला मिळेल. अमीरात आणि केपटाउन टीमचे नाव तिथली विशिष्ट शहर लक्षात घेऊन ठेवण्यात आले आहे.

### काही आठवड्यांत लिलावाची शक्यता

दोन्ही नवीन संघ समानतेने पुढे जातील. एमआयचा जागतिक क्रिकेटमधील वारसा अधिक उंचावतील असा विश्वास रिलायन्स इंडस्ट्रीजच्या डायरेक्टर नीता अंबानी यांनी व्यक्त केला. यूएई आणि दक्षिण आफ्रिकेतील टी २० लीगची सुरुवात पुढच्यावर्षी जानेवारी महिन्यापासून होऊ शकते. दक्षिण आफ्रिका लीगमध्ये ३० मार्की इंटरनॅशनल खेळाडू सहभागी होऊ शकतात. हा आकडा वाढूसुद्धा शकतो, असे लीगच्या आयोजकांनी म्हटले आहे. या लीगसाठी काही आठवड्यांत खेळाडूंचा लिलाव होऊ शकतो.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com